cmyk

## संपादकीय

### अरे बापरे.... पवित्र लोकशाहीमध्ये मतचोरी

भारत स्वतंत्र झाल्यानंतर निवडणूक आयोगाची स्थापन झाल्यापासून मुख्य निवडणूक आयुक्त नेमण्यासाठी तीन सदस्यांची कमिटी होती. त्यामध्ये पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांचा समावेश आहे. ही कमिटी मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करते. मात्र, भाजप सरकारने नुकतीच या निवडणूक कमिटीमध्ये सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीशांना काढून त्याजागी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची नेमणूक केली आहे. याचे उत्तर भाजप सरकारने जनतेला दिले पाहिजे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१२१ | मंगळवार, दि.२६ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### फडणवीस यांच्या हस्ते भागीदारी संस्था नोंदणीसाठी नवे संकेतस्थळ कार्यान्वित

मुंबईः वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते निबंधक, भागीदारी संस्था महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या २.० या उन्नत संकेतस्थळाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी निबंधक, भागीदारी संस्था यांच्या उन्नत केलेल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून भागीदारी संस्था व नागरिकांना अधिक वेगवान, पारदर्शक आणि सुलभ सेवा उपलब्ध होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, काळाच्या गरजेनुसार व तांत्रिक प्रगतीनुसार सुधारणा करून जनतेस अधिक सोयीस्कर, आधुनिक व वापरकर्त्यास अनुकूल असे हे संकेतस्थळ आहे. या संकेतस्थळांमध्ये केलेल्या सुधारणांमुळे जनतेचा वेळ, पैसा आणि श्रमाची बचत होणार आहे.

# शेतकऱ्यांना कर्जमाफी नाहीच!

## केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांची स्पष्टोक्ती

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**देशातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा केंद्र सरकारचा कोणताही विचार नाही, अशी माहिती केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी दिली. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे एकूण १५ लाख ९१ हजार २६ कोटी रुपयांचे कर्ज थकित आहे, असे त्यांनी सांगितले.**

देशातील कृषी कर्जात अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचा केवळ ५५ टक्के वाटा असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'देशातील वाढत्या शेतकरी आत्महत्या आणि कर्जबाजारीपणाच्या संबंधाचा केंद्र सरकारने अभ्यास केला आहे का? तसेच देशातील शेतकऱ्यांवर एकूण कर्ज किती आहे आणि केंद्र सरकार कर्जमाफी योजना आणण्याचा विचार करत आहे का?' असे प्रश्न श्रीमती मोईत्रा यांनी विचारले होते. त्यावर ठाकूर यांनी सांगितले, ''नाबार्डच्या ताज्या आकडेवारीनुसार, देशात ३१ मार्च २०२५ पर्यंत एकूण कृषी कर्ज २८ लाख



५० हजार कोटी असून, त्यापैकी १५.९१ लाख कोटी रुपयांचे कर्ज अल्प व अत्यल्प व भूधारक शेतकऱ्यांवर आहे.'' केंद्र सरकार कर्जमाफीपेक्षा दीर्घकालीन योजनांवर भर देत असून, स्वस्त कर्ज, पीकविमा योजना आणि हमीभाव खरेदी याद्वारे शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचे ठाकूर म्हणाले. तर कर्जबाजारीपणा आणि आत्महत्या यामधील संबंधाचे थेट मूल्यांकन सरकारने केले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (एनसीआरबी) अहवालात शेतकरी आत्महत्यांची कारणे नमूद नाहीत. कृषी हा राज्यांचा विषय आहे. त्यामुळे राज्य सरकारे त्यांच्या नियमांनुसार शेतकऱ्यांना मदत करत असल्याचे ठाकूर यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) योजनेअंतर्गत ३ लाखांपर्यंतचे कर्ज ७ टक्के व्याजदरावर उपलब्ध करून देण्यात येते. तसेच त्यावर १.५ टक्का सवलत आणि वेळेवर परतफेड केली तर

▶▶ पान २ वर

> **महाराष्ट्रातील कृषी कर्ज**
> नाबार्डच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रावर २ लाख ६० हजार ७९९ कोटी रुपयांचे एकूण कृषी कर्ज आहे. त्यापैकी १ लाख ३४ हजार ६५९ कोटी रुपयांचे कर्ज अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांवर आहे. म्हणजेच देशातील एकूण कृषी कर्जाच्या तुलनेत ९.१५ टक्के, तर देशातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या तुलनेत ८.४६ टक्के कर्ज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर आहे.

## थोडक्यात...

### एसटी कर्मचाऱ्यांचे पगार आज होणार

मुंबईः महाराष्ट्र सरकारने गेल्या आठवड्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ऑगस्ट महिन्याचा पगार गणेशोत्सवानिमित्त २६ ऑगस्टला देण्याचा निर्णय जाहीर केला होता. यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना देखील २६ ऑगस्टला पगार देण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. एसटी कर्मचाऱ्यांना देखील गणेशोत्सवानिमित्त २६ ऑगस्टला पगार दिला जाणार आहे. एसटी कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी राज्य शासनाकडून जुलै महिन्याच्या सवलतमूल्यापोटी प्रतिपूर्ती म्हणून ४७७ कोटी रुपयांचा निधी वर्ग करणारा शासन निर्णय देखील जारी करण्यात आला आहे.

### जीभ हातात काढून देऊ ; नितेश राणेंचा जरांगेंना इशारा

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटीवरुन मुंबईच्या दिशेने मोर्चा काढण्याच्या तयारीत असलेले मनोज जरांगे पाटील आणि भाजप नेत्यांमध्ये चांगलीच जुंपली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी बीडमध्ये झालेल्या सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईविषयी अपशब्द उच्चारल्याचा आरोप भाजप नेत्यांकडून केला जात आहे. आमच्या देवेंद्र फडणवीस साहेबांच्या आईबद्दल अपशब्द उच्चारण्याची हिंमत कोणी करत असेल तर ती वळवळणारी जीभ हातात काढून देण्याचे सामर्थ्य आमच्यासारख्या ९६ कुळी मराठ्यांमध्ये आहे, हे मनोज जरांगे यांनी लक्षात ठेवावे, असा इशारा नितेश राणे यांनी दिला.

### पंतप्रधान मोदींची पदवी सार्वजनिक करण्याचे आदेश रद्द

नवी दिल्लीः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पदवीची माहिती सार्वजनिक करावी, असा केंद्रीय माहिती आयोगाने (सीआयसी) दिलेला आदेश सोमवारी (दि. २५) दिल्ली उच्च न्यायालयाने रद्द केला. न्यायमूर्ती सचिन दत्ता यांनी दिलेल्या आदेशामुळे आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बीए पदवी सार्वजनिक करण्याची दिल्ली विद्यापीठाला गरज नाही. २०१६ मध्ये आयटीआय कार्यकर्ते नीरज कुमार यांनी दिल्ली विद्यापीठाकडे १९७८ मध्ये बीए उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे नाव, रोल नंबर, गुण आणि उत्तीर्ण–अनुत्तीर्ण झाल्याचा तपशील मागितला होता. याच वर्षी पंतप्रधान मोदींनीही बीएची परीक्षा उत्तीर्ण केली होती. सीआयसीने निकाल देताना म्हटले होते की, विद्यापीठ ही एक सार्वजनिक संस्था असल्याने ही माहिती सार्वजनिक केली पाहिजे आणि पदवीचा तपशील हा सार्वजनिक दस्तऐवज मानला जातो.

# गेवराईत राडा: प्रा.हाकेंच्या वाहनावर दगडफेकीने तणाव

## ओबीसी नेते प्रा.हाके व आ.पंडित समर्थक आमनेसामने घोषणाबाजी अन शिवीगाळ

गेवराई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार विजय राजे पंडीत आणि ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांच्या समर्थकांनी समोरासमोर येऊन एकमेका विरूद्ध घोषणाबाजी केल्याने, गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी चौकात तणाव निर्माण झाला. हा सगळा गोंधळ सोमवार ता. २५ रोजी साडेचार वाजता अचानक घडल्याने पोलीसांची दमछाक झाली. दरम्यान, दोन्ही गटाला पोलीसांनी बाजुला केल्याने अनर्थ टळला. दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी घोषणा देत एकमेकांना शिवीगाळ केली**



**शिवाय प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्या कार्यकर्त्यांवर दगडफेक देखील केल्याचे समजते**

गेल्या दोन दिवसांपापूर्वी प्रा. हाके यांनी आमदार पंडीत यांच्यावर टिका केली होती. त्यानंतर, दोन्ही गटात सोशल नेटवर्किंग साईटवर शाब्दिक हल्ले करण्यात आले होते. रविवार ता.२४ रोजी शास्त्री चौकात आ. पंडीत समर्थकांनी हाके यांचा पुतळा जाळून निषेध केला. सोमवारी काळे नावाच्या युवा नेत्याला गेवराई पोलीसांनी ताब्यात घेतल्याने पून्हा वाद झाला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गेवराई पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन करून, गजानन काळे यांना सोडण्याची मागणी केली. त्यानंतर काही वेळाने स्वतः प्रा. हाके यांचा ताफा गेवराई च्या दिशेने आल्याने, दोन्ही गट समोरासमोर आले. एकमेकांवर धाऊन जाण्याचा प्रयत्न झाला. एकमेका विरूद्ध घोषणाबाजी झाल्याने, तणाव निर्माण झाला. अज्ञातांनी हाके यांच्या गाडीच्या दिशेने दगडफेक केल्याने, तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. दरम्यान, आमदार विजयसिंह पंडित आणि आमदार प्रकाशराव सोळंके यांच्यावर केलेल्या

▶▶ पान २ वर

> **ओबीसी नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी आमदारावर केलेल्या आरोपानंतर आमदार पंडित यांनी हाके यांच्यावर आरोप केले लक्ष्मण हाके यांचा प्रतीकात्मक पुतळा जाळण्यात आला त्यानंतर ओबीसी समर्थकांनी याच ठिकाणी हाके यांच्या फोटोचा दुग्धाभिषेक केला आणि त्यानंतर हाके गेवराईत आले सोशल मीडियावर ओबीसी आणि पंडित समर्थक कार्यकर्ते एकमेकावर टीकाटिप्पणी करत होते तेच समोर समोर आल्यानंतर हा राडा झाला.**



## डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी


**मांजरसुंबा येथील एक महिला उपचारासाठी बीडच्या आई हॉस्पिटलमध्ये आज सकाळी आली असता डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे सदरील महिलेचा दुर्देवी मृत्यू झाला. केवळ आई हॉस्पिटलच्या दुर्लक्षपणामुळे आणि डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच महिलेचा मृत्यू झाला असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे.**

मांजरसुंबा येथील नाझमीन शकील सय्यद (वय २१) या महिलेला आईव्हीएफ करण्यासाठी बीड येथील आई हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. यावेळी डॉक्टरांकडून मोठा हलगर्जीपणा झाला. विशेष म्हणजे या हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभाग नसल्याचे सांगण्यात येते. महिलेची प्रकृती बिघडल्यानंतर डॉक्टरांकडून

▶▶ पान २ वर

# बीडच्या ऐतिहासिक खजाना विहीरीचे अस्तीत्व धोक्यात!

## पुरातत्त्व विभाग आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ऐतिहासिक वारशावर संकट



बीड । प्रतिनिधी

**बीड शहरा पासुन अगदी हाकेच्या अंतरावर शहराला लाभलेला समृद्ध असा ऐतिहासिक वारसा आहे. तसे या बीड जिल्ह्यातल्या अनेक वास्तू या प्राचीन इतिहासाच्या जिवंत साक्षीदार आहेत. मात्र या ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याकडे प्रशासन व पुरातत्त्व खात्याकडून गंभीर दुर्लक्ष होत असल्याने वारसा नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे. यामध्ये शहरा पासुन अवग्या ५ किलोमीटर अंतरावर ऐतिहासिक वास्तू असलेल्या खजाना बावडीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.**

बीड जिल्ह्यात पुरातत्त्व खात्याचे स्वतंत्र कार्यालय नसल्याने केवळ एकाच कर्मचाऱ्याकडे संपूर्ण जिल्ह्याची जबाबदारी आहे. तो कर्मचारी प्रत्यक्षात छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असल्याने , तेथून बीडमधील ऐतिहासिक वास्तूंची म्हणावी तशी योग्य देखरेखच होत नाही.बीड जिल्ह्याचे ऐतिहासिक महत्व पहाता बीड जिल्ह्याचे पर्यटन वाढवण्याच्या अनुषंगाने २०२१ मध्ये विभागीय आयुक्तांनी परिपत्रक काढले होते. या परिपत्रकानुसार जिल्ह्यातील सर्व ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याच्या उद्देशाने त्या ऐतिहासिक वास्तूंची मंडळ अधिकारी तलाठी ग्रामसेवक यांच्यामार्फत गाव शहरातील अशा ऐतिहासिक वास्तूंची तपासणी, पाहणी करून त्या ऐतिहासिक वास्तूंच्या महसूल दप्तरी विशेष नोंदी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. यासाठी विभागीय

▶▶ पान २ वर

# लक्ष्मण हाकेंची जीभ घसरली

## आ.विजयसिंह पंडितावर घेतले तोंड सुख



वडीगोद्री । प्रतिनिधी

**राज्यात मराठा आरक्षण आंदोलनावरुन वातावरण चांगलंच तापलं असून त्याचे पडसाद उमटले.गेवराईमध्ये लक्ष्मण हाके यांच्या कारवर दगडफेक झाल्यानंतर त्यांनी मनोज जरांगे आणि राष्ट्रवादीचे आमदार विजयसिंह पंडित यांच्यावर टीका केली. विजयसिंह पंडित यांच्यावर बोलताना लक्ष्मण हाके यांची जीभ घसरली आणि त्यांनी शिवीगाळ केली. वेळ पडली तर गेवराईमध्ये जाऊन आमदारकी लढवणार असंही हाके म्हणाले.**

गेवराईमध्ये लक्ष्मण हाकेंच्या गाडीवर दगडफेक झाली.गेवराईमध्ये शिवाजी महाराज चौकात लक्ष्मण हाके आणि आ. विजयसिंह पंडित यांचे कार्यकर्ते आमने सामने आले. याच चौकात जरांगेंच्या समर्थनार्थ पोस्टर लावण्यात आलं होतं, त्यावरून हा वाद झाला. त्यानंतर लक्ष्मण हाके यांनी पत्रकार परिषद घेऊन मनोज जरांगे आणि विजयसिंह पंडित यांच्यावर टीका केली.

**मुख्यमंत्रीच सुरक्षित नाहीत**

लक्ष्मण हाके म्हणाले की, ''मुख्यमंत्र्यांना गेल्या चार दिवसांपासून शिव्या दिल्या जात आहेत, तो महाराष्ट्राचा अपमान आहे. या राज्यात मुख्यमंत्रीच सुरक्षित

▶▶ पान २ वर

## गरीब मराठ्यांना मुर्ख बनवू नका

मुंबई । प्रतिनिधी

**मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा महायुती सरकारविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला आहे. मुंबईतील आझाद मैदानात हे आंदोलन होणार असून राज्यातील सर्व मराठा बांधवांनी मुंबईत यावे असे आवाहन त्यांनी केले आहे.**

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी जरांगे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सोशल मीडिया पोस्ट करत

▶▶ पान २ वर

# सदाभाऊ खोत यांच्यावर गोरक्षकांकडून हल्ला

## पुण्यात शेतकऱ्यांना धक्काबुक्की अन् राडा

पुणे । प्रतिनिधी

**पुण्यात गोरक्षकांकडून आमदार सदाभाऊ खोत यांना धक्काबुक्की करण्यात आली आहे. पुण्यातील द्वारकाधीश गोशाळेजवळ ही घटना घडली. आमदार सदाभाऊ खोत यांनी गोरक्षकांबद्दल एक वक्तव्य केले आणि त्यानंतर आक्रमक होत गोरक्षकांनी त्यांना धक्काबुक्की केल्याचा प्रकार घडला.**

पुण्यातील फुरसुंगी येथे द्वारकादास गौशाळेत आमदार सदाभाऊ खोत हे कार्यकर्त्यांसोबत गेले होते. त्यावेळी काही गौरक्षकांकडून त्यांना धक्काबुक्की करण्यात आली. या प्रकरणी बोलताना सदाभाऊ खोत म्हणाले की, ''राज्यामध्ये गोवंश कायद्याच्या आडोशाने शेतकरी दुधाळ जनावरे विकायला गेले तरी त्यांना मारहाण केली जाते, त्यांची जनावरे जबरदस्तीने नेली जातात. पोलीस स्टेशनला ही जनावरे गेल्यानंतर ती गोशाळेत नेली जातात. त्यानंतर दिवसाला २०० ते ५०० रुपये आकारले जाते.

▶▶ पान २ वर

## आरक्षण सभा:बीडमध्ये जरांगे पाटलाच्या रडारवर सीएम, डीएम अन् पीएम

# दादा फिदा मोकोकात, दादीन राहिली तिला बघू

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणासाठी लढणारे संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांनी २९ रोजी मुंबईमध्ये होणाऱ्या आंदोलनाच्या तयारीसाठी राज्यभर दौरे काढले काल मांजरसुंबा तालुका बीड येथे झालेल्या सभेत बोलताना आरक्षणाबरोबरच मुख्यमंत्र्यासह मुंडे बंधू–भगिनी चे नाव न घेता त्यांना रडार वर घेतले इथं दादा बिदा आता कुणी राहिले नाही त्यांना मोकोकात घातले आता दादीन राहिली तिच्याकडे बघू असा इशारा यावेळी दिला गेला याची चर्चा मात्र राज्यभर चांगलीच झाली.**

म्हणून जरांगे पाटील यांनी गेल्या



एक महिना भरापूर्वी सरकारला अल्टिमेट दिला होता जर मराठा समाजाला आरक्षण मिळाले नाही सगळ्या सोयऱ्याचा कायदा लागू केला नाही तर मुंबईत आंदोलन केले जाईल मात्र शासनाने अद्याप पर्यंत याची कसलीही दखल न घेतल्याने मनोज जरांगे पाटील यांनी चलो मुंबईचा नारा दिला आहे या आंदोलनाच्या तयारीसाठी ते स्वतः महाराष्ट्रभर बैठका घेत आहेत प्रामुख्याने काल रविवारी मांजरसुंबा तालुका बीड येथे बैठक घेण्यात आली मात्र या बैठकीला सभेचे स्वरूप आले नियोजन कसे सभेचेच करण्यात आले होते या सभेमध्ये बोलताना त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न तळमळीने मांडला मात्र सरकार याकडे दुर्लक्ष करत असल्याचे सांगताना त्यांनी सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली ही टीका करत असताना एकेरी भाषेवर देखील आले त्यातच या कार्यक्रमासाठी मराठा सेवकांनी डीजे लावण्याची परवानगी पोलीस अधीक्षककाडे मागितली मात्र त्यांना दिली नाही ही बाबही जरांगे पाटील यांना चांगलीच खटकली त्यांनी थेट गृहमंत्र्यावर आरोप करताना हे सगळे त्यांचेच कटकारस्थान असल्याचे जरांगे पाटील म्हणाले सत्ता येथे जाते आमचीही सत्ता आल्यावर बघून घेऊ असा इशारा दिला आता दादा फिदा कुणी राहिले नाहीत त्यांना

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७३.०० क्विंटल | २,४०० | २,९०१ | २,६२५ |
| ज्वारी/हायब्रिड :९०.०० क्विंटल | २,००० | ४,००० | २,३६८ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : २.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| बाजरी: २३.५० क्विंटल | २,००० | २,८०१ | २,५१८ |
| मुग: ३६.५० क्विंटल | ४,८०१ | ८,६९० | ७,०१२ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,००० | ६,१०० | ५,६८० |

cmyk

## अग्रलेख

# अरे बापरे.... पवित्र लोकशाहीमध्ये मतचोरी

भारत स्वतंत्र झाल्यानंतर निवडणूक आयोगाची स्थापन झाल्यापासून मुख्य निवडणूक आयुक्त नेमण्यासाठी तीन सदस्यांची कमिटी होती. त्यामध्ये पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांचा समावेश आहे. ही कमिटी मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करते. मात्र, भाजप सरकारने नुकतीच या निवडणूक कमिटीमध्ये सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीशांना काढून त्याजागी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची नेमणूक केली आहे. याचे उत्तर भाजप सरकारने जनतेला दिले पाहिजे.

जगात सुसंस्कृत आणि सर्वात मोठी पवित्र लोकशाही म्हणून भारत देशाकडे अभिमानाने पाहिले जात आहे. आतापर्यंत मतं विकल्याचं ऐकिवात होतं. मात्र, चक्क मतचोरी झाल्याचा भांडाफोड विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी केला आणि देशाच्या कानाकोपऱ्यात खळबळ उडाली आहे. माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी पुष्टी दिली आणि त्यापाठोपाठ आता मनसेनेते राज ठाकरे यांनीही दुजोरा दिला आहे. ग्रामीण भागामध्ये शेतात काम करणारी मंडळी इमानदार होती, ती म्हणायची जातं बदलेल पण पात बदलणार नाही. तसं आम्ही लोकशाहीमध्ये पवित्र मत विकणार नाही, असंही ठासून सांगितलं जात होतं. आतापर्यंत आम्ही चोरी, दरोडा, लबाडी ऐकलं होतं. मात्र, मतचोरीचा प्रकार पहिल्यांदाच पाहिल्याचं सोशल मीडियावर प्रत्येकाने ठासून मत व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला गुप्त मतदान करण्याचा हक्क दिला आहे, तो बजावण्यासाठी कर्मचारी-अधिकाऱ्यांना अर्धी सुटी, दोन तास वेळ दिला जातो, तसं पोस्टल मतदानाची पद्धत रूढ आहे. त्यातून प्रत्येकजण मतदानाचा हक्क बजावतो आणि निकाल लागल्यानंतर मत वाया गेलं नाही, हे अभिमानाने सांगताना मतदारराजाचा ऊर भरून येतो. मात्र, मतचोरी झाल्याचा प्रकार उघड झाला आणि सामान्यांच्या काळजात धस्स झालं. त्यामुळे मागिल दहा-बारा वर्षांतील निवडणुकांमध्ये घोटाळा झाला का असा प्रश्न प्रत्येक मतदाराला सतावू लागला आहे. लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष सक्षम असावा लागतो, ही बाब त्रिकालाबाधित सत्य आहे. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांना प्रचंड बहुमत मिळाले होते, तरीसुद्धा त्यांनी विरोधी पक्षाला सन्मानाची वागणूक दिली होती, याचा विसर आजच्या राज्यकर्त्यांना पडलेला दिसत आहे. मतचोरी उघड होताच सत्ताधाऱ्यांनी समर्पक उत्तर देणे अपेक्षित होते. मात्र, राज्यकर्त्यांनी मूळ प्रश्नाला बगल देत त्यांच्या बुद्धिमत्तेवर प्रश्न निर्माण केले आहे. फ्लॅट, मतदार यादीमध्ये दहा बाय दहाची झोपडीमध्ये ६० व्यक्ती कशा राहू शकतात, हा प्रश्न वस्तूस्थितीला धरून विचारला गेला, त्यावर सत्ताधाऱ्यांना समर्पक उत्तर देता आले नाही यातच उत्तर दडलं आहे. मतदार यादीमध्ये एकाच नावाचे अनेक लोक वेगवेगळ्या पत्त्यांवर वेगवेगळे फोटो वापरून नावे घुसडण्याचा प्रकार उघड झाला आहे. त्यावर निवडणूक आयोगाने उत्तर देणे अपेक्षित असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पत्रकार परिषद घेऊन राहुल गांधींच्या बुद्धीमत्तेवर शंका घेत आहेत. देशाचे पंतप्रधान मतचोरीवर प्रश्नांवर चकार शब्द बोलायला तयार नाहीत. त्यामुळे राहुल गांधी हे देशातील चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. त्यांनी मत चोरल्याचा बॉम्ब टाकून केंद्रीय निवडणूक आयोगच नाही तर सत्ताधाऱ्यांना झटका दिला आहे. आता त्यात ज्येष्ठ नेते शरद पवार, शिवसेना (उबाठा) उद्धव ठाकरे, मनसे नेते राज ठाकरे यांनीही उडी घेतली आहे.

राहुल गांधी यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मदतीने भाजपाने मतांची चोरी करून मतांची हेराफेरी केल्याचा खळबळजनक दावा केला. आरोपांवर न थांबता त्यांनी थेट पुरावे दिले. कर्नाटक, महाराष्ट्रात वाढलेल्या मतदारांच्या संख्येवर त्यांनी मोठे प्रश्नचिन्ह उभे केले. त्यांनी मतदार याद्यातील घोळावर प्रकाश टाकला. एकाच ठिकाणचा पत्ता टाकून किती बोगस मतदार वाढवले याची जंत्रीच त्यांनी पत्रकार परिषदेत मांडली. त्यानंतर भाजपच्या आमदार, खासदार, मंत्र्यांसह बगलबच्च्यांनी त्यांच्यावर तिखट प्रतिक्रिया दिली. निवडणूक आयोगाने राहुल गांधींचा आरोप म्हणजे नवीन बाटलीत जुनी दारू अशी टीका केली आणि त्यांना माफी मागण्यास सांगितले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राहुल गांधी यांनी मांडलेल्या मत चोरीच्या मुद्याला समर्थन दिले. निवडणूक आयोगाला जर त्याच्यावर आक्षेप असेल तर त्यांनी स्पष्टीकरण द्यावे. त्यांनी राहुल गांधी यांच्या आरोपावर दूध का दूध आणि पानी का पानी करावे असे आवाहन शरद पवारांनी निवडणूक आयोगाला दिले. त्यामुळे आता विरोधक मत चोरी प्रकरणात आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. निवडणूक आयोगांवर लावलेल्या आरोपांची चौकशी व्हायला पाहिजे अशी मागणी शरद पवार यांनी केली. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर आक्षेप नोंदवला आहे. त्यांच्या आरोपांवर संशय घेण्यास वाव आहे. आयोगावर लावलेल्या आरोपांची सखोल चौकशी झाली पाहिजे असे शरद पवार म्हणाले. राहुल गांधी यांच्या आरोपांवर निवडणूक आयोगाने उत्तर दिले पाहिजे. त्यांनी राहुल गांधींकडे शपथपत्र मागणे चुकीचे असल्याचे शरद पवार म्हणाले. तर निवडणूक आयोगावर आरोप झाले आहेत. राहुल गांधींच्या आरोपांना निवडणूक आयोगाकडून उत्तर हवे आहे, भाजपाकडून नको, असा टोलाही पवारांनी लगावला आहे.

# शिवराज महाविद्यालय मध्ये विद्यापीठ वर्धापन दिन साजरा



**परतूर । प्रतिनिधी**

शिवराज महाविद्यालय परतूर येथे बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन साजरा करण्यात आला. मुख्य ध्वजारोहण प्र. प्राचार्य प्रा. एस. आर. नाटकर यांच्या हस्ते संपन्न झाले. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले ध्वजारोहना नंतर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सिद्धार्थ नाटकर होते. प्रमुख व्याख्यात्या प्रा. मोरे सर यांनी विद्यापीठ स्थापना व विद्यापीठ विषयी यावेळी माहिती आपल्या मौलिक शब्दात मांडली तर अध्यक्षांनी आपले विद्यापीठ हे ज्ञानाचे दीपस्तंभ असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची अमूल्य देणगी आहे. आपण सारे मिळून विद्यापीठाचा गौरव वाढवू, हेच आजच्या वर्धापन दिनाचे खरे यश आहे, अशा शब्दात आपले विचार व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आरती गायकवाड मॅडम यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. संदीप शाहीर सर यांनी केले. यावेळी प्रा. सी. एस. राजपुत, प्रा. एस. एल. शाहीर, प्रा. जी. बी. मोरे, प्रा. जी. बी. डव्हारे, प्रा. बी. एम. शेंडगे , प्रा. व्हि. आर. भारसाखळे, प्रा. एम. एस. सराफ, प्रा. एस. ए. देशपांडे, प्रा. पी. एस. सुरुंग, प्रा. के. जी. चव्हाण, प्रा. ए. एस. गायकवाड, प्रा. एन. बी. गायकवाड, प्रा. ए. एस. चुंगडे, श्री. एस. पी. कवाळ, श्री. एस. एम. कुरेशी, श्री. जी. पांढरपोटे आदी उपस्थित होते.

# पावसामुळे नुकसान झालेल्या कुटुंबांना मदतीच्या संचाचे वितरण-जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या सततधार पावसामुळे बाधित झालेल्या शहरातील कुटुंबांना सेंटर फॉर एग्रीकल्चर अँड डेव्हलपमेंट अर्थात कार्ड संस्थेच्या माध्यमातून शेल्टर कम हायजीन किट्सचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. परंतु सदरील संच वाटप संदर्भात या संस्थेने आतापर्यंत असे कुठे काम केले यासंदर्भात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना विचारले असता त्या म्हणाले की यासंदर्भात मला काही माहिती नाही सदरील माहिती उद्या विचारपूस करून देण्यात येईल असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.**



जालना येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात दि.२५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता संच वाटप कार्यक्रम पार पडला. यावेळी महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त राजू एडके , सनदी लेखापरीक्षक स्नेहल मोदाळे, निखिल बाहेती, डॉ.दीपक बुक्तरे, पत्रकार नूर अहमद कुरेशी,कार्डचे अध्यक्ष सुवर्णा दांडगे,उपाध्यक्ष डॉ.रामदास निहाळ, सचिव पुष्कराज तायडे, कोषाध्यक्ष सोनिया तेलगड यांची उपस्थिती होती. वाटप करण्यात आलेल्या शेल्टर कम हायजीन किट्समध्ये ताडपत्री,सतरंजी, मच्छरदाणी,टूथपेस्ट,ब्रश, अंगाची व कपडे धुण्याची साबण, सॅनिटरी नॅपकिन,दोरी, बॅग आदी साहित्य आहे. वाटप प्रसंगी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी कार्डच्या मदतीबद्दल अभिनंदन करून आपत्ती काळात अशीच मदत करत रहा असे सांगून संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुष्कराज तायडे यांनी केले यात त्यांनी अमेझॉन,डोनेट कार्ट कडून जालना जिल्ह्यात आलेल्या अतिवृष्टी बाधित कुटुंबांना ३०० किट्स उपलब्ध करून देण्यात आल्या असून त्याचे वाटप जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात येत असून बाधित कुटुंबांपर्यंत पोहचणार आहोत. असे स्पष्ट केले.तर सूत्रसंचालन आणि आभार प्रा.डॉ.रामदास निहाळ यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी भास्कर उघडे, विशाल उघडे, राहुल उघडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी बाधित नागरिक उपस्थित होते.

# जि.प.च्या २३ जिल्हा शिक्षक पुरस्कारासाठी ४७ शिक्षकांनी दिल्या मुलाखती

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेच्या ५ सप्टेंबर रोजी देण्यात येणाऱ्या जिल्हा शिक्षक पुरस्कारासाठी सोमवार दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. बीड जिल्हा परिषदेच्या वतीने प्राथमिक ११, माध्यमिक १० आणि विशेष २ असे एकूण २३ पुरस्कार वितरित केले जातात. त्यासाठी सदर मुलाखती सोमवारी घेण्यात आल्या.**

जिल्हा शिक्षक पुरस्कारासाठी प्राथमिक शिक्षणातील ३७ पैकी ३२ शिक्षकांनी मुलाखती दिल्या. वडवणी येथे जिल्हा परिषदेची माध्यमिक शाळा नाही. त्यामुळे उर्वरित १० तालुक्यातील १० शिक्षकांना पुरस्कार दिले जातात. मात्र यावर्षी बीड तालुक्यातील माध्यमिक शाळेतील एकही शिक्षकांचा पुरस्कारासाठी प्रस्ताव आला नाही. उर्वरित ९ तालुक्यातील १० जणांनी प्रस्ताव सादर केले. त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. विशेष शिक्षकांच्या २ पुरस्कारासाठी ७ प्रस्ताव आले होते. त्यातील ७ पैकी ५ शिक्षकांनी मुलाखती दिल्या. दोघे जण अनुपस्थित राहिले. सदर जिल्हा परिषदेच्या शिक्षक पुरस्कारासाठी प्रकल्प संचालक डीआरडीए. वगळता समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. सदर मुलाखतीसाठी निवड समितीचे अध्यक्ष अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आल्या. यावेळी सदस्य म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य प्रतिनिधी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल कल्याण, जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रतिनिधी आणि शिक्षणाधिकारी (प्रा.) यांची उपस्थिती होती.

# गणेशोत्सव : परंपरा, एकात्मता आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख

**महाराष्ट्र सरकारने नुकताच एक ऐतिहासिक निर्णय घेत सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा दिला आहे . सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी विधानसभेत ही घोषणा करताना " गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या आत्म्याचा उत्सव आहे " असे प्रतिपादन केले . हा शासन निर्णय केवळ औपचारिकता नाही , तर लोकमान्य टिळकांच्या सामाजिक दृष्टीकोनाला सलाम करणारा , परंपरेला मान्यता देणारा आणि भविष्यातील पिढ्यांना दिशा दाखवणारा आहे.**

इतिहासाच्या पाऊलखुणा : गणपती ही बुद्धी , विद्या , समृद्धीची देवता . वैदिक काळापासून गणेशोपासना अस्तित्वात आहे . परंतु १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले आणि ब्रिटिशांच्या विरोधात समाज एकत्र येण्याचे माध्यम निर्माण केले . गल्ल्या , वाडे , मोहल्ले एकत्र आले आणि गणपती बाप्पा मोरयाच्या घोषणांनी इंग्रजांविरुद्ध लढ्याला जनाधार दिला.महाराष्ट्रातील परंपरा : महाराष्ट्रात गणेशोत्सव म्हणजे भक्ती , संस्कृती , समाजसेवा आणि लोकसहभाग यांचा संगम . पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपतीपासून मुंबईतील लालबागचा राजापर्यंत असंख्य मंडळे आपल्या कलात्मक मांडणी , सामाजिक उपक्रम आणि धार्मिक वातावरणासाठी प्रसिद्ध आहेत . लोकमान्य टिळकांनी घडवलेला हा उत्सव आज " गल्लोगल्लीतील बाप्पा " म्हणून महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात पोचला आहे . महाराष्ट्रातील गणेश उपासनेत "अष्टविनायक यात्रा" विशेष मानली जाते . पुणे जिल्ह्यातील आठ प्राचीन गणेश मंदिरे मुरुडचे मोरेश्वर , सिद्धटेकचे सिद्धिविनायक , ओझरचा विघ्नहर , लेण्याद्रीचा गिरिजात्मक , रांजणगावचा महागणपती , थेऊरचा चिंतामणी , पालीचा बल्लाळेश्वर आणि महडचा वरदविनायक या सर्वांना एकत्र भेट देणे ही यात्रा पूर्ण मानली जाते . भक्त आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आणि गणरायाच्या कृपेचा लाभ घेण्यासाठी ही यात्रा करतात . त्यामुळे अष्टविनायक ही गणेशभक्तीची अनोखी परंपरा आहे . ओव्या अजूनही आपल्याला भूतकाळाशी जोडतात

**" गणराया गणपती देवा**
**तुझ्या चरणी माथा ठेवा**
**मंगलमुर्ती मोरया रे**
**दूर करो संकट सारे ."**

भारत आणि जगातील गणेशोत्सव : आज गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही . गोवा , कर्नाटक , आंध्र प्रदेश , तेलंगणा इथून तो दक्षिण भारतात विस्तारला . उत्तर भारतात दिल्ली , मध्य प्रदेशात जबलपूर आणि इंदूर येथे मोठ्या उत्साहाने गणेशोत्सव होतो . परदेशातही भारतीय समाजाने हा उत्सव रूजवला आहे . लंडन , दुबई , सिंगापूर , अमेरिकेतील न्यू जर्सी व कॅलिफोर्निया , ऑस्ट्रेलिया , कॅनडा येथे दरवर्षी गणेशोत्सव साजरा केला जातो . परदेशातील गणेशोत्सव परदेशात राहणाऱ्या भारतीयांसाठी एक ओळखीचे घर बनतो . गणेशोत्सव आणि समाजसेवा : गणेशोत्सव केवळ धार्मिक विधी नाही , तर विधायक कामांचे व्यासपीठ आहे . अनेक मंडळे रक्तदान शिबिरे , आरोग्य शिबिरे , वृक्षारोपण , शैक्षणिक मदत , आपत्तीतील मदतकार्य अशी उपक्रम राबवतात . गणेशोत्सव हा लोकांना " फक्त साजरा नाही , तर समाजासाठी काही देणगी दे " हे स्मरण करून देतो . गणेशोत्सव आणि एकात्मता : गणेशोत्सव हिंदू-मुस्लीम एकतेचा सेतू ठरला आहे . इतिहासात अनेक मंडळांच्या मिरवणुकांमध्ये सर्व धर्मीय सहभागी झाले . डोलताशे , लेझीम , भजन-कीर्तन , नृत्य , कलाविष्कार सर्वांनी मिळून गणपतीला " लोकोत्सव " बनवले . तो फक्त धार्मिक नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक संगम आहे.संगीत, गाणी आणि बाप्पा : गणेशावर आधारित असंख्य ओव्या , अभंग , गवळणी लोकजीवनात लोकप्रिय आहेत . आधुनिक काळातही बप्पावर आधारित हिंदी चित्रपट गाणी लोकप्रिय झाली " सदैव सदा गणेश गणेश", " गणपती बाप्पा मोरया" (अग्निपथ चित्रपट ), " देवा श्री गणेशा " ( अग्निपथ ), " गणेश आया है " ( भूतनाथ रिटर्न्स ) यासारखी गाणी आजही मिरवणुकीत दुमदुमतात . लोककला , शास्त्रीय संगीत , आणि आधुनिक बॉलिवूड सर्वांनी मिळून बाप्पाची भक्ती अधिक रंगतदार केली आहे. शासन निर्णयाचे महत्त्व : या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने सार्वजनिक गणेशोत्सवाला " राज्य उत्सव " घोषित करणे ही केवळ परंपरेला मान्यता नव्हे तर सांस्कृतिक अस्मितेची जपणूक आहे . यामुळे मंडळांना शासकीय सुविधा मिळतील , उत्सवाची मुळे अधिक घट्ट होतील आणि जागतिक पातळीवर महाराष्ट्राची ओळख ठळक होईल. बाप्पा हे महाराष्ट्राचे स्पंदन : गणेशोत्सव आपल्याला शिकवतो भक्ती ही एकत्र आणणारी आहे , कला ही संस्कृतीला समृद्ध करणारी आहे आणि समाजकार्य हे खरी पूजा आहे . " गणेशोत्सव " हा महाराष्ट्राच्या जीवनातला श्वास आहे . ' जय देव जय देव जय मंगलमूर्ती दर्शनमात्रे मनकामना पूर्ती " गणेशोत्सव हा केवळ राज्य उत्सव नाही तर तो महाराष्ट्राच्या मनाचा उत्सव आहे , आणि आता शासनाने त्याला दिलेला मान म्हणजे परंपरेच्या मूळांना अधिक बळ देणे होय.



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार,बीड**

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांना

३ टक्के सूट दिली जाते. त्यामुळे किसान क्रेडिट कार्डचे कर्ज शेतकऱ्यांना ४ टक्के व्याजदराने मिळते. तर पीएम किसान, पीकविमा, ई-नाम, पीएम सूक्ष्म सिंचन योजना, आत्मा, डिजिटल कृषी, नैसर्गिक शेती आदी योजनांमधून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर दिला जात आहे, असा दावाही ठाकूर यांनी केला.

---------

### डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळ

सारवासारव करण्याचा प्रयत्न झाला. मात्र आई हॉस्पिटलमध्ये नाझमीन यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यानंतर त्या महिलेला बीडच्या दीप हॉस्पिटलमध्ये आई हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाने दाखल केले. मात्र ती अधिच मृत्यू पावल्याचे लक्षात आल्यानंतर नातेवाईकांनी आई हॉस्पिल व्यवस्थापन आणि डॉक्टर यांच्या हलगर्जीपणामुळे महिलेचा मृत्यू झाल्याचे सांगून दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

------------

### गेवराईत राडा: प्रा.हाकेच्या

कथित वादग्रस्त वक्तव्याचे तीव्र पडसाद रविवारी गेवराई शहरात उमटले. संतप्त झालेल्या मराठा आणि ओबीसी समाजातील युवकांनी प्रा.हाके यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला आधी दंडुकाने मारहाण केली. पुतळा पायाखाली तुडवून जाळला. या घटनेमुळे शहरातील राजकीय वातावरण तापले होते. तसेच आमदार समर्थकांनी हाके यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले होते. दरम्यान सोमवारी लक्ष्मण हाके यांनी विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांना आव्हान देत ज्या ठिकाणी माझा पुतळा जाळला. त्याच ठिकाणी दुग्धाभिषेक करून चहा पिणार असल्याचे चॅलेंज दिले होते. यावरून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन्ही गटातील समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. लक्ष्मण हाके या ठिकाणी येताच विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या ताफ्यावर दगडफेक करून, चप्पल फेकल्या. दरम्यान परिस्थिती नियंत्रणाच्या बाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी कार्यकर्त्यांवर लाठीचार्ज केला. तसेच गेवराई पोलिसांच्या लक्ष्मण हाके यांच्या गाडीला घेराव घालत शहराबाहेर काढले, यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. गेवराई शहरात तणावपूर्ण शांतता आहे. पोलीसांनी प्रकरण व्यवस्थित हाताळल्याने तणाव आटोक्यात आला आहे.

-----------

### गरीब मराठ्यांना

प्रकाश आंबेडकर यांनी जरांगे यांना काही सवाल केले आहेत. गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका, अशी देखील टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. आंबेडकर म्हणाले मनोज जरांगे तुम्ही मराठ्यांच्या आरक्षणासाठी सरकारविरुद्ध लढत आहात. पण, सरकारमध्ये कोण आहे? आताच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे, अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, अशोक चव्हाण, नारायण राणे सारखे प्रस्थापित मराठा आहेत. अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडीचे सरकार असतांना सत्तेत सर्व प्रस्थापित मराठा नेते होते. शरद पवार, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात हे सर्व प्रस्थापित मराठे सत्तेत होते.तुम्ही निवडणुकीत या श्रीमंत मराठ्यांचा प्रचार केला आणि त्यांना मतदान केले. तुम्ही गरीब मराठ्यांसाठी आंदोलन करत आहात पण, गरीब मराठ्यांना वंचित ठेवणा-या श्रीमंत मराठ्यांना तुम्ही पाठिंबा देत आहात. गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका, अशी टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तुम्ही श्रीमंत मराठ्यांना पाठिंबा दिला होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तुम्ही पुन्हा तीच भूमिका घ्याल आणि गरीब मराठ्यांना मूर्ख बनवाल का? असा सवाल देखील प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला आहे.

--------

### लक्ष्मण हाकेंची जीभ घसरली

नाहीत असा आमचा समज आहे. महाराष्ट्रातल्या ओबीसींची बाजू मांडणाऱ्या कार्यकर्त्यावर असा जर हल्ला होत असेल तर गावगाड्यातील सर्वसामान्य लोकांचं काय? लक्ष्मण हाके म्हणाले की, "देवेंद्र फडणवीसांनी मराठ्यांना १० टक्के आरक्षण दिलं आहे. पण यांना ओबीसीतूनच आरक्षण हवं आहे. याचा अर्थ ओबीसींचे आरक्षण संपवण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि आम्ही तो होऊ देणार नाही. आम्ही सामाजिकदृष्ट्या मागासलेले आहोत, आमच्या आरक्षणाशिवाय तुम्ही काहीही घ्या. राज्यातील ५८ लाख कुणबींच्या नोंदींमुळे ओबीसींचे आरक्षण संपलं आहे असा माझा दावा आहे."

**विजयसिंह पंडितांना आव्हान**

अजित पवार आणि विजयसिंह पंडित यांच्यावर लक्ष्मण हाके यांनी आक्षेपार्ह टीका केल्यानंतर त्याला पंडित यांनी उत्तर दिलं. त्यावेळी त्यांनी हाके यांना श्वानाची उपमा दिली. विजयसिंह पंडित यांच्या या टीकेला उत्तर देताना लक्ष्मण हाके म्हणाले की, "आम्ही भटकेच आहोत. पण तुला पिढ्यानपिढ्या मतदान करुन आम्ही आमदार केलं. त्याने मनोज जरांगेला पाठिंबा दिला. संविधानाचा भंग केला असून त्याची आमदारकी रद्द करा. वेळ आली तर गेवराईमध्ये जाऊन आमदारकीला उभा राहणार. यावेळी लक्ष्मण हाके यांनी शरद पवार आणि आमदार प्रकाश सोळंके यांच्यावरही टीका केली. एकीकडे शरद पवार हे मंडल यात्रा काढत आहेत, तर दुसरीकडे त्यांचे खासदार बजरंग सोनवणे हे मनोज जरांगे यांना पाठिंबा देतात हा विरोधाभास असल्याचं हाके म्हणाले.

---------------

### बीडच्या ऐतिहासिक खजाना

आयुक्त यांनी एक समिती नेमण्यात आली होती. परंतु, नेमलेल्या समितीने अद्याप एकही बैठक घेतलेली नाही. परिणामी खजाना बावडीसह जिल्ह्यातील इतर प्राचीन वास्तूंचे जतन होण्याऐवजी त्या उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा जर अशाच दुर्लक्षामुळे नष्ट झाला, तर येणाऱ्या पिढ्यांना इतिहासाच्या खुणा पाहायला मिळणार नाहीत, असा गंभीर प्रश्न आता पुढे आला आहे या ठिकाणी पावित्र्य राखले जात नाही विशेष म्हणजे पुरातत्त्व विभागाने याकडे दुर्लक्ष केले तर खजाना विहीर नामशेष व्हायला वेळ लागणार नाही जिल्हा प्रशासनाने काही बंधने घालणे गरजेचे आहे

**प्रशासनाला हे प्रश्न आहेत**

'खजाना बावडीसारखी ऐतिहासिक वस्तू डोळ्यांसमोर नष्ट होत आहे, पण प्रशासन मात्र गप्प आहे. इतिहासाची अशी उपेक्षा करायची असेल, तर भविष्यातील पिढ्यांना वारसा दाखवायचा कसा?, 'बीडला समृद्ध वारसा मिळाला आहे, पण त्याचे जतन करण्यासाठी प्रशासनाने काहीच उपाययोजना केलेल्या नाहीत. ,'पर्यटन वाढवण्यासाठी, रोजगार निर्मितीसाठी या वास्तूंचा उपयोग होऊ शकतो. पण त्याऐवजी त्या कोसळून नष्ट होण्याकडेच वाटचाल करतायत. जबाबदार अधिकारी व विभाग झोपेत आहेत.'इतिहास वाचवायचा असेल तर तातडीने पुरातत्त्व विभागाने बीडमध्ये स्वतंत्र कार्यालय स्थापन करावे आणि खजाना बावडीसारख्या वास्तूंचे जतन करावे.

----------

### आरक्षण सभा:बीडमध्ये जरांगे पाटलाच्या

अगोदरच मोकोकामध्ये हात घातले आता फक्त दादीन राहिली आहे तिलाही बघू असा गर्भित इशारा धनंजय मुंडे पंकजा मुंडे यांचे नाव न घेता त्यांनी दिला मुख्यमंत्र्यांना आणि त्यांच्यावर केलेल्या आरोपा संदर्भात आज दिवसभर भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी जरांगे पाटलांना टार्गेट केले. त्यानंतर जरांगे पाटील यांनी आपण मुख्यमंत्र्यांच्या आई विषयी बोललोच नाही बोललो असेल तर माझे शब्द माघार घेतो असे एका वृत्तवाहिनीला बोलताना सांगितले परंतु दादा-बिदा मुकोकात केलेत हा रोज त्यांचा धनंजय मुंडे यांचे कार्यकर्ते वाल्मीक कराड यांच्या बाबतीत होता मात्र आता फक्त दादीन राहिली तिच्याकडे बघू म्हणजे आता ही दादीन कोण असा प्रश्न निर्माण होत आहे जर दादा म्हणून मुंडे कडे रोज असेल तर दादी म्हणून नक्कीच पंकजा मुंडे कडे त्यांचा रोष असावा असेही बोलले जात आहे.

---------

### सदाभाऊ खोत यांच्यावर

याचा निकाल जर वर्षाने किंवा दीड वर्षाने लागला तर शेतकरी दंड भरू शकत नाही. त्यामुळे ती जनावरे तो माघारी नेत नाही. साताऱ्यातील कोरेगाव तालुक्यातील १० म्हशी आणि त्याची ११ पाडसे ही पुण्यातील द्वारकाधीश गोशाळेत आणण्यात आली होती. त्या म्हशी जाग्यावर आहेत की नाही हे पाहायला गेलो होतो. पण गोरक्षकांनी त्याला विरोध केला." दोन महिन्यांपूर्वी सांगलीच्या शेतकऱ्यांना मारहाण करून त्यांचा दहा म्हशी जबरदस्तीने फुरसुंगीच्या गोशाळेत नेऊन ठेवल्याचा आरोप केला जात होता. या प्रकरणी शेतकऱ्यांनी न्यायालयात जाऊन या म्हशी परत मिळवण्यासाठी आदेश मिळाले होते. तो आदेश घेऊन शेतकरी गोशाळेत म्हशी घेण्यासाठी गेल्यानंतर त्या म्हशी गोशाळेत नसल्याचे लक्षात आले. गोशाळेत या प्रकरणी विचारपूस केल्यावर त्या ठिकाणच्या गोरक्षकांनी उडवाउडवीची दिली. म्हशींना चरायला डोंगरावर सोडल्यावर त्या निघून गेल्याचे उत्तर गोरक्षकांनी दिले. याप्रकरणात शेतकऱ्यांची ना दाद ना फिर्याद अशी परिस्थिती झाली. त्यामुळे या गोरक्षकांवर कारवाई करावी अशी मागणी सदाभाऊ खोत यांनी केली आहे.

**गोरक्षकांकडून शेतकऱ्यांना त्रास**

गोरक्षणाच्या नावाखाली राज्यात मोठी लॉबी सुरू असून त्यांचे कॉर्पोरेट ऑफिस आहेत. गोरक्षकांकडून शेतकऱ्यांना त्रास देण्याचे काम सुरू आहे. यावर सरकारने लक्ष घालून कारवाई करावी. शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या गोरक्षकांवर कारवाई झाली नाही तर पोलीस स्टेशन समोर आम्ही जनावराच्या छावण्या उभ्या करू असा इशारा सदाभाऊ खोत यांनी दिला होता. त्यांच्या याच वक्तव्यावरुन गोरक्षक आक्रमक झाल्याचे दिसून आले.

------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. २६ ऑगस्ट २०२५ | ३

## थोडक्यात...

### संघर्ष मोर्चामध्ये बहुसंख्येने उपस्थित रहा –बाळासाहेब आडसरे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील दौलावडगाव सर्कल मधील सर्व आजी –माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच सर्व भावी इच्छुक यांनी आपापल्या प्रत्येक गावातून राजकारणाचे हेवेदावे बाजूला ठेवून या सकल मराठा समाज यांच्या नवपिडत उज्वल भविष्यासाठी जो संघर्ष उभा केला गेला आहे ते संघर्ष योद्धा माननीय मनोज दादा पाटील यांच्या चलो मुंबई या आंदोलनाला सर्व राजकीय तेड सोडुन सर्वपक्षीय नेत्यांनी पाठिंबा देत या मुंबई या चलो मुंबई मोहिमेमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवा मनोज दादांच्या नेतृत्वाखालील चलो मुंबई या महायज्ञात सहभागी व्हावे अशी कळकळीची विनंती नम्र मराठा सेवक बाळासाहेब आडसरे यांनी केली आहे.



### पाटोदा येथे रानभाजी महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

तालुका कृषी अधिकारी कार्यालय पाटोदा येथे रानभाजी महोत्सव कार्यक्रमाचे आयोजनकरण्यात आले होते या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी श्री.ओमकार शेळके,कृषी अधिकारी अतुल आंधळे,मंडळ कृषी अधिकारी सुरज नागरगोजे, बीटीएम बालासाहेब तांबडे , उप कृषी अधिकारी श्रीमती विद्या शिंदे,श्री. बलराम जवणे, श्रीमती मंगल मिसाळ,राजू कुंभार, सहाय्यक कृषी अधिकारी श्री रमेश पवार, रामेश्वर पवळ, जालिंदर साबळे, माणिक शेवाळे, सुधीर राऊत, श्रीमती सुलोचना धस, श्रीमती विद्या बडे, श्री. शरद कर्डुले,श्रीहरी वाघ, कौटुळे, दिलीप भोंडवे, मच्छिंद्र राऊत, अनारसे, ज्ञानेश्वर वीर, उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आत्माचे बी आर तांबडे यांनी केले या कार्यक्रमास प्रगतशील शेतकरी संतोष गर्जे, नरहरी पवळ, मोहन सोनवणे, जालिंदर सुरवसे, शांतीलाल तांबे, दादासाहेब राख, शहादेव गिरे, गोकुळ डिसले, आबासाहेब चौरे, बबन पवार, हरिदास तांबे, सुरेश पाटील, अंकुश उगलमुगले, जयसिंग नागरगोजे, व शेतकरी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात संतोष नागरगोजे यांनी रानभाजीचे शहरी लोकात जनजागृती करणे व रानभाजी आहारात किती महत्त्वाची आहे ते सांगितले , व कृषी विभाग व आत्मा राबवत असलेला कार्यक्रम किती स्तुत्य आहे त्यामुळे कार्यक्रमाचे कौतुक केले,श्री. दादासाहेब राख यांनी शेवगा भाजीची पानांचे महत्त्व सांगितले गुडघेदुखीचा त्रास होत असेल तर शेवग्याची पाने सावलीत सुकवून त्याची भक्ती करून मधासोबत खाल्ल्यामुळे गुडघेदुखीचा त्रास नाहीसा होतो असे त्यांनी सांगितले घेतलेल्या अनुभवातून सांगितले, पात्री भाजीपासून मुतखडा नाहीसा होतो हे पण त्यांनी अनुभवातून सांगितले. कार्यक्रमांमध्ये २५ प्रकारच्या रानभाज्या उपलब्ध करण्यात आलेल्या होत्या तसेच शेतकरी बचत गट प्रतिनिधी, कंपनी प्रतिनिधी, व इतर शेतकरी यांनी मोर्चाला भेट देऊन माहिती समजून घेतली.



म्हसोबावाडी : आष्टी शहरातील युवा उद्योजक अक्षय अग्रवाल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, युवा उद्योजक अक्षय भोसले, अनिल शेठ अग्रवाल, विजय साठे,पत्रकार प्रेम पवळ, सोपान पगारे, शेषेराव शेकडे दिसत आहेत.

# शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरा –आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

विद्यापीठांनी नवीन तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचविण्यासाठी काम करून पशुधनातील दुधोत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरली पाहीजे तसेच पर्यावरणीय असंतुलन, हवामान बदलाकडे लक्ष दिले पाहिजे. नामशेष होणारी पिके, मिलेट लागवड वाढवली हवीत.तसेच हवामानाचा अचुक अंदाज घेवुन तंत्रज्ञानात बदल करून उत्पादन वाढ केली पाहीजे असे मत आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केले दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई यांच्या वतीने प्रक्षेत्र दिवस उडीद व रब्बी पीक व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम (दि२३ रोजी)हरिनारायण आष्टा ता. आष्टी येथे घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जि.प. सदस्य अमरराजे निंबाळकर हे होते. प्रमुख पाहुणे गोरख तरटे तालुका कृषी अधिकारी – आष्टी, व सागर पठाडे तालुका कृषी अधिकारी – केज हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार



सुरेश धस यांनी केले. व्यासपीठावर गणेश माळवे सरपंच–आष्टा, वैभव पठाडे – उपसरपंच आष्टा तसेच कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ नरेंद्र जोशी, कृष्णा कर्डिले, प्रमोद रेणापुरकर, डॉ. प्रदीप सांगळे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृष्णा कर्डिले,शास्त्रज्ञ (पीकविद्या) यांनी केले. कडधान्यवर्गीय पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार–प्रचार व्हावा तसेच मृदा आरोग्य व्यवस्थापनाबरोबर शेतकरी उत्पादन व उत्पन्न वाढावे हा या कार्यक्रमाचा हेतु असल्याचे सांगुण कृषि विज्ञान केंद्राने आष्टी तालुक्यात केलेल्या कामाची माहीतीही त्यांनी दिली. उद्यानविद्या शास्त्रज्ञ नरेंद्र जोशी यांनी कांदा लागवडीबाबत माहीती देताना जुन्या वाणाच्या वापराऐवजी नवीन वाण लागवड व बिजोत्पादनाबाबत मार्गदर्शन केले. नवीन संशोधित वाण लागवड तंत्रज्ञान व साठवणुकीतील बदलावर त्यांनी प्रकाश टाकला. कांदा लागवडीची पंचसुत्री शेतकऱ्यांना दिली. कार्यक्रमात ‘शेतकरी यशोगाथा’ पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच शेतकरी प्रणोम शिंदे व सतीश पठाडे यांनी मनोगत व्यक्त केले. केंद्राने केलेल्या कामामुळे २२ ते ३०%. उत्पादन वाढुन खर्च कमी झाल्याचे त्यांनी सांगितले. उद्घाटनपर मार्गदर्शनात आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, विद्यापीठांनी नवीन तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचविण्यासाठी काम केले पाहीजे. पशुधनातील दुधोत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरली पाहीजे तसेच पर्यावरणीय असंतुलन, हवामान बदलाकडे लक्ष दिले पाहिजे. नामशेष होणारी पिके, मिलेट लागवड वाढवली पाहीजेत. हवामानाचा अचुक अंदाज घेवुन तंत्रज्ञानात बदल करून उत्पादन वाढ केली पाहीजे. पिक विमा योजनेसाठी उंबरठा उत्पन्न गृहित धरणार आहेत त्यामुळे नुकसान होताच अर्ज करावेत. कांद्याची साठवण क्षमता वाढवावी म्हणजे दर बदल झाला तरी नुकसान होणार नाही. केंद्राने तयार केलेल्या मिलेट किटचेही त्यांनी कौतुक केले. तसेच विषमुक्त अन्न निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. असे नमुद करुन कृषी विज्ञान केंद्राने केलेल्या कामाचे कौतुक केले. सागर पठाडे यांनी कांदा चाळीचे प्रस्ताव देण्याबाबत सुचित केले. गोरख तरटे यांनी सेंद्रिय शेती पद्धतीबाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली. डॉ. प्रदीप सांगळे यांनी कीड–रोग व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली. आभार प्रमोद रेणापुरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास पंचक्रोशीतील ३०० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाची यशस्वीतेसाठी विविध शेतकरी गट, शेतकरी सतीश पठाडे, प्रणोम शिंदे, गळगटे, भाऊ धोंडे व इतरांनी परिश्रम घेतले. कृषी आणि किसान कल्याण मंत्रालय भारत सरकार यांच्या अन्न सुरक्षा व पोषण कार्यक्रम अभियान अंतर्गत समुहप्रथम दर्शनी योजनेच्या माध्यमातुन जामगाव, गांधनवाडी व ह. आष्टा येथील ५३ शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिके राबविण्यात आली.

# २९ ऑगस्ट चलो मुंबई मराठा आरक्षणाची आरपारची लढाई

## मराठा बांधवांनी लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे –राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

गेली ४० वर्षापासून मराठा आरक्षणाचा लढा चालू आहे.राजकीय हेतूने प्रेरित होऊन शासनकर्ते मराठा आरक्षणाकडे दुर्लक्ष करत आले आहेत. ओबीसी मधून मराठा बांधवांना आरक्षण मिळाले पाहिजे, यासाठी मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील दोन वर्षापासून सातत्याने संघर्ष करत आहेत. राज्यात बहुसंख्येने असणारा मराठा समाजाचा विकास खुंटला असून समाजातील तरुणांचे भवितव्य अधांतरी लटकले आहे. दारिद्र्य व आर्थिक संकटात अडकलेल्या मराठा समाजाला उन्नतीच्या मार्गावर जाण्यासाठी



आरक्षणाची गरज आहे. प्रगतीच्या मुख्य प्रवाहात मराठा समाजाला स्थान मिळाले पाहिजे.

न्याय मागणीसाठी दिनांक २९ऑगस्ट २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे मनोज दादा जरांगे पाटील उपस्थितीत आंदोलन होणार आहे. भावी पिढीच्या भवितव्या साठी मराठा बांधवांनी लाखोच्या संख्येने या लढ्यात सहभागी व्हावे. असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी

डोंगर पाटोदा ता. बीड येथील अखंड हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी उपस्थित भाविक भक्तांसी संवाद साधताना केले आहे.

बीड तालुक्यातील पाटोदा (बे) येथे श्रीक्षेत्र नारायण गडांचे महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शना खाली चौदाव्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता नारायण गडाचे नूतन उत्तराधिकारी हभप संभाजी महाराज यांच्या कीर्तनाने झाली. पंडित तुपे व त्यांचे सहकारी अमोल माने,अविनाश बडगे, बाबू माने, चंद्रसेन माने, भरत माने, दादा गोंदवले, गोविंदा गोंदवले, अशोक तुपे, यांच्यासह समस्त गावकरी मंडळींनी खंड हरिनाम सप्ताहाचे यशस्वी नियोजन केले. सांगता समारोप प्रसंगी परिसरातील भावी फक्त बहुसंख्येने सहभागी झाले होते.

पान ६ वरुन...

### केएसके महाविद्यालयात आ.विक्रम

आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विषयांवर प्रकाश टाकण्यासाठी आयोजित चर्चासत्रात ३ देशांमधून ७ जणांनी नोंदणी केली, हेच या उपक्रमाचे यश आहे. तसेच परराज्यातून २५ जणांनी सहभाग घेतला. जसे काही प्राचार्य मंडळीकडून नॅकसंदर्भात मार्गदर्शन घेतले जाते, त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन कसे करावे याचे मार्गदर्शन डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडून घ्यावे, असे मला वाटते. अगदी परराज्यातील कलावंतांना आमंत्रित केले. आदिवासी विषयांवर सर्व अंगाने प्रकाश टाकला, असे ते म्हणाले. प्रास्ताविक प्रा.बळीराम राख यांनी केले. सूत्रसंचलन पत्रकार मयुरा सावी यांनी केले, तर आभार चर्चासत्राचे निमंत्रक प्रा.हमराज उईके यांनी मानले. चर्चासत्रात आदिवासी समाजातील संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, प्राध्यापक, शिक्षकांचा सहभाग घेतला.

आयुष्यातील महत्त्वाचा अनुभव बीडच्या कॉन्फरन्समध्ये मिळाला : प्रा.डॉ.बोंगानी मखोंझा

दक्षिण आफ्रिका विद्यापीठाच्या कला व संगीत विभागाचे वरिष्ठ प्रा.डॉ.बोंगानी मखोंझा यांनी समारोपाचे मनोगत व्यक्त केले. पुढे बोलताना ते म्हणाले, बीडमध्ये कॉन्फरन्सला येऊन मला असे वाटले की जणू माझ्या आयुष्यातील एक महत्त्वाचा अनुभव मला येथे मिळाला. या कॉन्फरन्समध्ये फक्त एकतर्फी विचार मांडले गेले नाहीत, तर एक अर्थपूर्ण संवाद साधला गेला. येथे येऊन मला आयुष्याचे नवनवीन अनुभव मिळाले. त्याचप्रमाणे, मानवी जीवनाची तीन महत्त्वाची अंग म्हणजे सरकार, समाज आणि प्रगती ही एकत्र येऊ शकतात, हे सिद्ध झाले. येथील संवाद हा एका प्रकारे जागतिक स्तरावर पोहोचलेला आहे. कारण मला माझ्या देशातील विचार व भारतातील विचार यांमध्ये साम्य जाणवले. कोणतीही समस्या सोडवायची असेल तर संपूर्ण जग एकत्र आले पाहिजे, असे मला वाटते. बीड येथे संपन्न झालेली ही कॉन्फरन्स ही माझ्या जगभर अटेंड केलेल्या सर्व कॉन्फरन्सपैकी सर्वात यशस्वी कॉन्फरन्स आहे, अशा शब्दात त्यांनी कौतुक केले.

बिरसा मुंडा यांच्या विचारांचा सखोल अभ्यास व्हावा –संगीतादेवी पाटील

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, आदिवासी समाजातील स्त्री–पुरुष समानता व पर्यावरणपूरक जीवनशैली ही अनुकरणीय बाब आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रयत्नांमुळे या चर्चासत्राचा बहुमान बीडला मिळू शकला. त्या पुढे म्हणाल्या की, आदिवासी नायक बिरसा मुंडा यांनी समाजात क्रांती निर्माण केली. त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास व्हावा, असे आवाहन त्यांनी केले.

परदेशी पाहुण्यांनी साकारली महाराष्ट्राची वेशभूषा

दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या परदेशी पाहुण्यांनी महाराष्ट्रातील पारंपारिक वेशभूषा परिधान केली होती. या वेशभूषेने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले.

डॉ.क्षीरसागर दांपत्यासह प्रा.हमराज उईके यांचा सत्कार

आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचा सत्कार संस्थेचे प्रशासक, सर्व प्राचार्य तसेच बीड जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या वतीने करण्यात आला. तसेच चर्चासत्राचे निमंत्रक प्रा.हमराज उईके यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल त्यांचा नवगण शिक्षण संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

### राज्यपाल हरिभाऊ बागडेंच्या

विविध उपक्रम राबवून गरजुंसाठी विधायक कामे केली व करत आहेत. तर त्यांच्या पत्नी तथा देवठाणा–जैतापुर ग्रुप ग्राम पंचायतच्या सरपंच सौ.छायाताई यांनी ही ग्राम पंचायत अंतर्गत विविध विकास योजना प्रत्यक्षात राबवत सर्वांगीण विकासाला चालना दिली.गावातील लोकांचे वैयक्तिक प्रश्नांसह सार्वजनिक प्रश्न सोडवण्यास कटिबद्ध असतात. एकुणच दराडे दांपत्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना भूमिपुत्र पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.याबद्दल दराडे दांपत्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### मराठी साहित्य परिषदेच्या

ते अविरत कार्यरत राहतील, अशी अपेक्षा परिषदेकडून व्यक्त करण्यात आली आहे. त्यांच्या कार्याद्वारे सात्विक सुविचारांची पेरणी करून समानतेचा मळा फुलवला जाईल, यावर परिषदेचा विश्वास आहे.त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांना अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

### अन्यायकारक अधिभार

प्रसारण शुल्क, व्हिलींग शुल्क, इंधन समायोजन अधिभार, स्थिर शुल्क तसेच विविध कर व अधिभार यांच्या आकारणीमुळे सामान्य ग्राहकांवर अतिरिक्त भार येत आहे. औद्योगिक व व्यापारी ग्राहकांवर लावावयाचे अधिभार प्रत्यक्षात घरगुती ग्राहकांवर लादले जात आहे.विशेषत्वाने निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे की, स्मार्ट मीटर बसविण्याची योजना प्रत्यक्षात खाजगी कंपनीच्या फायद्यासाठी राबविण्यात आलेली असून, त्यातून सामान्य नागरिकांना बिल वाढणे, चुकीचे रीडिंग, आणि ग्राहक सेवेत होणाऱ्या त्रुटी यामुळे अनेक अडी अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संदर्भातील तक्रारींची दखल घेतली जावी व तातडीने स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक असल्याचे निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले.वरीलप्रमाणे कार्यवाही तातडीने करण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधिताना निर्देश द्यावेत, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली. यावेळी जिल्हाप्रमुख मीराताई नवले, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महुवले, जिल्हा संघटक संजय महाद्वार, माजी .प .स नवनाथ प्रभाळे ,विधानसभा प्रमुख सुशील भैया पिंगळे, हनुमान काशिद ,कामगार सेना रवी वाघमारे,, गणेश लोणकर , सतीश परदेशीं, शरद पवार सुनील जगताप , रमेश नवले, रंगनाथ पैठणकर ,बलराज कोटुळे , विशाल तांबे सह शिवसैनिक उपस्थित होत.

### पळून गेलेले जोडपे पकडले

हद्दीतच काही अंतरापर्यंत पळून गेल्याचे स्पष्ट झाले.पोलिसांनी पाठलाग सुरु केल्यानंतर मात्र या जोडप्याला कुणकुण लागताच मोबाईल बंद झाला.त्यामुळे पोलिसांना शेतात आणि वस्तीत साडेतीन तास तपास मोहीम राबवावी लागली.दरम्यान पोलिसांच्या या प्रयत्नांना यश आले असून दोघांनाही पोलीस ठाण्यात नोंद घेऊन पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. सदर कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील,श्री.प्रधान,हनुमान इंगोले,किरण मिसाळ,संदीप गायकवाड यांच्या वतीने करण्यात आली.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटची वार्षिक सभा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेटची वार्षिक सभा दि २४ ऑगस्ट रविवार रोजी संपन्न झाली. सदरील सभेमध्ये मागील आर्थिक वर्षातील आर्थिक पत्रके लेखापरीक्षण अहवाल, संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अॅड रवींद्र कानडे यांनी सभेमध्ये मांडले व संस्थेच्या सुविधा व सुरक्षिततेवर प्रकाश टाकण्यात आला.आज संस्थेचा एकूण व्यवसाय ५२९ कोटी पेक्षा अधिक असून त्यामध्ये एकूण कर्ज वाटपाच्या ९७ % कर्ज वाटप हे सुरक्षित सोनेतारण कर्जवाटप आहे व संस्थेचा स्वनिधी २७ कोटी आहे यासर्व बाबीचे अवलोकन केले असता सभासदांचे हित जोपासून ठेवीना सुरक्षा कवच निर्माण करण्याचे काम संस्था सातत्याने करत आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष





आर.जी. कानडे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की,मंगलनाथ समूह गेली २५ वर्षापासून सेवा देत आहे व स्थापनेपासून सभासदांना सातत्याने १२% लाभांश देण्यात येत आहे यावर्षी देखील परंपरागत संस्थेच्या सभासदांना १२% लाभांश देण्याचे योजिले आहे त्याच बरोबर केवळ व्यवसाय वाढ हे धोरण न ठेवता वैधानिक बाबीची पूर्तता करून संस्था स्थापने पासून लेखापरीक्षण अ वर्ग प्राप्त संस्था आहे मागील वर्ष हे सहकार क्षेत्रासाठी अतिशय आव्हानात्मक होते अनेक संस्था तरलतेअभावी कार्य करू शकल्या नाही त्यामध्ये श्री मंगलनाथ मल्टीस्टेट संस्था अश्या परस्थितीत भक्कमपणे उभे राहून सभासदांना अविरत सेवा देण्याचे कार्य करत आहे याचे कारण म्हणजे संस्थेच्या सभासदांच्या ठेवीन देण्यात येणारी सुरक्षितता व जलद सेवा यांच्या सूत्रांवर आधारित निर्माणकेलेल्या सभासदांच्या विश्वासाच्या बळावर संस्था अविरत कार्य करत आहे.असे सांगितले यापुढे देखील रोप्यमहोतस्वी वर्षानिमित्त विविध योजना सभासदांकरिता आखून सुरक्षित कर्ज वाटप करून ठेवीन अधिकाधिक सुरक्षितता प्रधान करण्याचे कार्य संस्था सातत्याने करणार आहे असे सांगितले व मागील काळात सहकार्य करणाऱ्या सभासदांचे आभार व्यक्ते केले.या सभेसाठी संस्थेचे उपाध्यक्ष जाधव नारायण,सर्व सन्माननीय संचालक मंडळ व सभासद वर्ग शेकडोच्या संख्येने उपस्थतीत होते.

### माधवराव वाघ यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

येथील भक्ती कन्स्ट्रक्शन, सेवानिवृत्त शिक्षक माधवराव पडजुबा वाघ वय ७८ यांचे दिर्घ आजाराने रविवारी (दि.२४) निधन झाले. त्यांच्या प्रश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील



आजीवन शिक्षण विभागातील प्राध्यापक डॉ.आनंद वाघ यांचे ते वडील होत. माधवराव वाघ हे बंकटस्वामी शिक्षण संस्थेत शिक्षक पदी कार्यरत होते. तसेच पतसंस्थेचे अध्यक्ष, संस्थेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. माधवराव वाघ यांच्यावर बीड येथील स्मशानभुमीत अत्यंसंस्कार करण्यात आले.

DAILY RAJYA LOKTANTRA DATE-26-08-2025

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

**OLD NAME**

QAMRU BI

**NEW NAME**

KAMRUBI MANVARKHA PATHAN

ADDRES. NAGZARI GOLA PANGARI AMBAD JALNA PIN CODE. 431204

MOBILE NO. 9168099826

DAILY RAJYA LOKTANTRA DATE-26-08-2025

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

**OLD NAME**

TAUFIK MUNVAR KHA PATHAN

**NEW NAME**

TAUFIK MANVARKHA PATHAN

ADDRES. NAGZARI GOLA PANGARI AMBAD JALNA PIN CODE. 431204

MOBILE NO. 9168099826

# अगामी निवडणुकीत भ्रष्ट व्यवस्था उखडून टाका – मा.खा. इम्तियाज जलील

**माजलगाव । प्रतिनिधी**

ऑल इंडिया मजलिस–ए–इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) पक्षाच्या माजलगाव येथील जाहीर सभेत पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांनी सामाजिक एकता आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी जोरदार आवाज उठवला. या सभेत त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीत पक्षाच्या नियोजनबद्ध रणनीती आणि भ्रष्ट व्यवस्थेला उखडून टाकण्याच्या संकल्पाची घोषणा केली.

जनतेच्या सेवेसाठी एमआयएमचा निर्धार इम्तियाज जलील यांनी सभेला संबोधित करताना सांगितले की,





‘‘एआयएमआयएमचा मुख्य हेतू हा सर्वसामान्य जनतेची सेवा करणे आणि त्यांच्यातूनच सक्षम नेतृत्व निवडणे आहे. आम्ही येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ताकदीने उतरून भ्रष्ट व्यवस्थेला आव्हान देऊ.‘‘ त्यांनी उपस्थित जनसमुदायाला मतदानाच्या माध्यमातून पक्षाला आशीर्वाद देण्याचे आवाहन केले, जेणेकरून सामाजिक न्याय आणि समतेची लढाई अधिक बळकट होईल.

मुस्लिम समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सडेतोड भाष्य जलील यांनी मुस्लिम समाजावर होत असलेल्या अन्यायावर भाष्य करताना, जातीवादी शक्तींमुळे निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी नुकत्याच घडलेल्या सुलेमान पठाण यांच्या दुर्दैवी हत्येचा उल्लेख करत, या प्रकरणातील आरोपींवर तातडीने कारवाई न झाल्यास कठोर पावले उचलण्याचा इशारा दिला.

ही सभा यशस्वी करण्यासाठी मा तालुका अध्यक्ष इद्रीस पाशा, मा जिल्हा उपाध्यक्ष शेख युसुफ, सिद्दीक भाई, मौलाना फारुख सहाब हाफीज फारुख सहाब, युनुस भाई, समीर भाई आणि आजी माजी पदाधिकारी कार्यकर्तेनी परिश्रम घेतले.

cmyk




राज्य लोकतंत्र शेत-शिवार
मंगळवार दि. २६ ऑगस्ट २०२५


# ई-पीक पाहणीत मोठा बदल; आता २० मिटर अतरावरुन फोटो

पुणे : शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतातील पिकांची नोंदणी स्वतःच्या मोबाइलद्वारे करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाने ई-पीक पाहणी हे डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित पद्धत संपूर्ण राज्यात लागू केली आहे. १४ सप्टेंबर पर्यंत तुम्ही तुमच्या शेतात जाऊन स्वतःच्या मोबाईलवरून ई पीक पाहणी करू शकणार आहात. यासाठी सुरुवातील ५० मीटर अंतरावरून फोटो काढावे लागतील असे बोलले जात होते. परंतु आता ५० मीटर नव्हे तर २० मीटरवरून फोटो काढावे लागणार आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नव्या सूचनेनुसार, जेव्हा तुम्ही पीक पाहणी कराल आणि पिकाचा फोटो काढण्याचा प्रयत्न कराल तेव्हा तो फोटो तुमच्या शेतीच्या गट क्रमांक पासून २० मीटरच्या आत घेणे गरजेचे आहे. हेच अंतर जर लांब असेल तर तुम्हाला कोणताही फायदा होणार नाही. अशी पीक नोंदणी अवैध सुद्धा मानली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने हि बाब लक्षात ठेवावी आणि मगच फोटो काढावा. ई पीक पाहणी अँप हे तुम्हाला गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असेल.



दरम्यान, यंदा खरीप हंगामासाठी पीक नोंदणी प्रक्रिया १ ऑगस्टपासून सुरू झाली असून शेतकऱ्यांना १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहेत. आत्तापर्यंत ९ लाख ५७ हजार १७७ शेतकऱ्यांनी इ- पीक पाहणी ॲपच्या माध्यमातून आपली माहिती भरली आहे. त्यात ९ लाख २ हजार ८३० हेक्टरवरील लागवडीची नोंद झाली आहे. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे ई पीक नोंदणी करत असताना काही अडचणी येत असतील तर प्रत्येक गावासाठी एक सहाय्यकाची नेमणूक सुद्धा शासनाच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. दि. १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत शेतकरी स्वतः त्यांच्या शेतात जाऊन ई पीक नोंदणी करू शकतात. परंतु समजा, शेतकऱ्यांनी स्वतः नोंदणी केली नाही, तर प्रत्येक गावासाठी नेमलेले सहाय्यक १५ सप्टेंबर ते २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ई पीक नोंदणी करून घेतील. परंतु शेतकऱ्यांनी शक्यतो स्वतःच उत्साहाने स्वतःच्या शेतातील पिकाची नोंदणी मोबाईल द्वारे करावी, शासकीय यंत्रणांवर अवलंबून राहू नये, जेणेकरून नोंद अचूक व वेळेत पूर्ण होईल. असं आवाहन करण्यात आलं आहे.

०००

काय फायदे मिळतील?

२० मीटर अंतरावरून ई पीक पाहणी केल्याने प्रत्यक्ष लागवडीचे स्पष्ट फोटो दिसतील. नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग येईल. पिकांची नोंद अधिक अचूक होईल. पीक पाहणी अधिक प्रभावीपणे करता येईल. पीक पाहणी प्रक्रिया अधिक सुलभ आणि सोप्पी होईल.

## मोसंबी-संत्रा पिकाला कीटकांचा धोका; जाणून घ्या उपाययोजना



संत्रा व मोसंबी ही महाराष्ट्रातील प्रमुख फळपिके आहेत. या पिकांना विविध प्रकारचे कीड-रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. त्यामध्ये फळातील रस शोषणारा पतंग हा एक महत्त्वाचा कीडशत्रू आहे. या पतंगामुळे फळांचे मोठे नुकसान होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. या कीटकामुळे उत्पादनात मोठी घट होत असून शेतकरी चिंतेत आहेत. मात्र योग्य उपाययोजना करून या कीटकाचा प्रादुर्भाव आटोक्यात आणता येऊ शकतो.

नुकसानाची लक्षणे :हा पतंग मोसंबी व संत्रा फळांना छिद्र करून त्यातील रस शोषून घेतो. अशा फळांवर तपकिरी डाग दिसतात व रस निघाल्यानंतर फळ कोमेजून जाते. रस शोषल्याने फळांमध्ये कुज येते व फळ बाजारात विक्रीस अयोग्य बनते. फळांची चव, रंग व वजन यावर थेट परिणाम होतो. अनेकदा फळे जमिनीवर गळून पडतात व उत्पादनात थेट घट होते.

एकात्मिक व्यवस्थापन उपाययोजना :फळांची सफाई व बांधणी. अंडी, अळी व कोषाला पूरक असणारी फळे तसेच बागेत पडलेली फळे त्वरित जमा करून जमिनीत पुरावीत. वासरवेल, चांदवेल आदी वेलवर्गीय पिके बागेतून काढून टाकावीत.फवारणी व फळांचे संरक्षण :संध्याकाळी बागेत धूर करावा, त्यामुळे पतंग दूर पळतो. झाडावरील पिकलेली केळी बागेत ठेवून त्यावर आकृष्ट झालेल्या पतंगांना पकडून नष्ट करावे. फळ हिरवे रंगांधून पिवळसर रंगात रूपांतर होत असताना १० ते १५ दिवसांच्या अंतराने नीम तेल (१० मिली/लिटर पाणी) फवारावे.

प्रकाश सापळे :बागेमध्ये प्रकाश सापळे लावावेत. प्रकाशाकडे आकर्षित झालेले पतंग पकडून नष्ट करावेत.

रासायनिक उपाय :मलेथिऑन (१०० मिली) + गुर (१०० ग्रॅम) + फळांचा रस (१०० मिली) प्रति लिटर पाण्यात मिसळून आमिष तयार करावे. हे आमिष झाडामध्ये भांड्यात ठेवून पतंगांना आकर्षित करून नष्ट करता येते. फळांचे नुकसान टाळण्यासाठी पतंगाचा प्रादुर्भाव आढळताच एकात्मिक व्यवस्थापन करणे अत्यावश्यक आहे. जैविक उपाय, नीम तेल फवारणी, प्रकाश सापळे व रासायनिक आमिष या सर्वांचा एकत्रित वापर करून फळांचे रक्षण केल्यास चांगले उत्पादन व गुणवत्ता राखता येते.

## मुसळधार पावसानंतर पिकांच्या वाढीसाठी विद्राव्य खते फायदेशीर

पाण्यात विरघळणाऱ्या खतांना विद्राव्य खते म्हणतात. सूक्ष्मसिंचनातून आणि ठिबक सिंचनातून दिले जातात, याचसोबत फवारणीद्वारेही या खतांचा वापर करता येतो. ठिबक सिंचनातून विद्राव्य खते दिल्यास खतांची ३० टक्क्यांनी बचत होते. मात्र, सध्या अनेक भागात जोरदार पावसामुळे शेतात पाणी साचलेले असल्यामुळे फवारणीद्वारे विद्राव्य खते द्यावी. दाणेदार खतांचा पिकाला १००% फायदा होत नाही. बाकी राहिलेली खते जमिनीमध्ये तशीच राहून मातीच्या सुपीकतेवर परिणाम करतात. या तुलनेत विद्राव्य खते पिकासाठी फायदेशीर ठरतात. ही खते अचानक निर्माण झालेल्या अन्नद्रव्यांच्या आवश्यकतेवेळी पिकांना उपयोगी ठरतात, कारण पिकांना दाणेदार खतांच्या तुलनेत लवकर उपलब्ध देखील होतात आणि मातीच्या सुपीकतेवरही परिणाम करत नाहीत. या खतांच्या वापरासंबंधी संपूर्ण माहिती घेतल्यास शेतकरी खतांच्या संपूर्ण कार्यक्षमतेने वापर करु शकतात.





फायदे :ही खते रासायनिक दाणेदार खतांच्या तुलनेत पिकांना लवकर उपलब्ध होतात. त्यामुळे अन्नद्रव्याचा तातडीने पुरवठा करायचा असल्यास ही खते फवारणीद्वारे देता येतात. जास्त दिवसांपासून जमिनीतून खत देणं शक्य झाले नाहीतर विद्राव्य खते फायदेशीर ठरतात. विद्राव्य खताचा वापर केल्यास खताची नासाडी होत नाही. पिकाच्या वाढीच्या काळात, फुलोऱ्याच्या काळात, फळधारणेच्या काळात, फळांच्या वाढीसाठी जेव्हा अन्नद्रव्यांची जास्त प्रमाणात आवश्यकता असते अशा वेळेला विद्राव्य खतांची फवारणी फायदेशीर ठरते. विद्राव्य खते पिकातील अचानक निर्माण झालेल्या अन्नद्रव्यांची कमतरता भरुन काढू शकतात जी सध्या अचानक आलेल्या पावसामुळे झाली आहे. विद्राव्य खतांमुळे जास्त मनुष्यबळाची गरज लागत नाही. विद्राव्य खतांच्या वापरामुळे पीक उत्पादनात फायदा होतो. जमिनीतून दिल्या जाणाऱ्या खतांमधून जमिनीवर बऱ्याचदा वाईट परिणाम होतात. मात्र विद्राव्य खतांमुळे जमिनीच्या गुणधर्म आणि सुपीकतेवर परिणाम होत नाही.

## हरभऱ्याचे काबुली वाण व त्यांची वैशिष्ट्ये

हरभरा हे रब्बी हंगामातील कमी पाण्यावर येणारे कडधान्य पीक आहे. मानवी आहारात या पिकाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. हरभऱ्याच्या काबुली वाणास बाजारात चांगला दर मिळत असल्याने अनेक शेतकरी काबुली हरभऱ्याची लागवड करतात. हरभऱ्याची पेरणी १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत करता येते. विराट :हा वाण ११० ते ११५ दिवसांत तयार होतो. जिरायतीमध्ये सरासरी ११ क्विंटल प्रति हेक्टर तर बागायती क्षेत्रामध्ये सरासरी १९ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळते. अधिक टपोरे दाणे व मर रोगास प्रतिकारक्षम वाण आहे. १०० ग्रॅम दाण्यांचे वजन ३५ ग्रॅम मिळते.

कृपा :या वाणाचा कालावधी १०५ ते ११० आहे. मर रोगास प्रतिकारक्षम असून सफेद पांढरे दाणे आहेत. बागायतीमध्ये १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळते. या वाणापासून



जास्त टपोरे दाणे मिळतात.पीकेव्हीके-२ :हा वाण १००-१०५ दिवसात काढणीस येतो. मर रोगास प्रतिकारक्षम असून अधिक टपोरे दाणे मिळतात. १०० ग्रॅम दाण्यांचे वजन ४० ग्रॅम मिळते. बागायती क्षेत्रात या वाणापासून सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते.पीकेव्ही- ४ :हा वाण मररोगास प्रतिकारक्षम आहे. या वाणापासून अधिक टपोरे दाणे मिळतात. हा वाण १०० ते ११० दिवसांत तयार होतो. प्रतिहेक्टरी सरासरी १२ ते १५ क्विंटल उत्पादन मिळते.बीडीएनजीके-७९८ :उभट पसरणारा हा वाण असून मध्यम आकाराचे दाणे असतात. हा वाण मररोग व खुजारोगास मध्यम प्रतिकारक्षम आहे. या वाणाचा कालावधी ११० ते ११५ दिवस आहे. या वाणापासून सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.

## अधिक उत्पादनासाठी आले (अद्रक) लागवडीची पद्धत बदला

आले पिकासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. या जमिनीत त्याचे पीक चांगले वाढते आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळते. आले लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ६.० ते ७.५ दरम्यान चांगली मानली जाते. २५ ते ३५ सेल्सिअस तापमान आल्याच्या रोपांसाठी सर्वात योग्य मानले जाते.

भारतीय बाजारपेठेत आल्याला वर्षभर मागणी असते. त्यामुळे शेतकरी त्याच्या लागवडीतून चांगला नफा मिळवू शकतात.

योग्य माती आणि हवामान : आले पिकासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. या जमिनीत त्याचे पीक चांगले वाढते आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळते. आले लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ६.० ते ७.५ दरम्यान चांगली मानली जाते. २५ ते ३५ सेल्सिअस तापमान आल्याच्या रोपांसाठी सर्वात योग्य मानले जाते. त्याच्या झाडांना चांगली आर्द्रता आणि योग्य





सिंचन आवश्यक आहे. आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्याचे उत्पादन ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये केले जाते.

शेणखताचा वापर : आल्याच्या शेतातून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात शेणखत वापरावे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कुजलेले शेणखत, निंबोळी आणि गांडूळ खत घालून ते शेताच्या जमिनीत चांगले मिसळावे. यानंतर, माती समतल करावी. आता शेतकऱ्यांना ते लहान-लहान वाफ्यात विभागून हेक्टरी २ ते ३ क्विंटल बियाणे घेऊन शेतात पेरणी करावी लागते. दक्षिण भारतात, आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्यानंतर सिंचन केले जाते.

कमाई लाखात : बियाणे पेरल्यानंतर ८ ते ९ महिन्यांनी पीक पूर्णपणे तयार होते. आल्याचे पीक योग्य प्रकारे पिकल्यावर त्याची वाढ थांबते आणि पिके पिवळी पडून सुकायला लागतात. आल्याची लागवड केल्यास शेतकऱ्यांना हेक्टरी १५० ते २०० क्विंटल उत्पादन मिळू शकते. बाजारात यापैकी एक किलोची किंमत सुमारे ४० रुपये किंवा त्याहून अधिक आहे. त्याची लागवड करून शेतकरी ३.५ ते ४ लाख रुपये सहज कमवू शकतात.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१३०३ : अल्लाउद्दीन खिलजीने चित्तोडगड जिंकले.
१४९८ : मायकेल अँजेलो याने 'पिएटा' या जगप्रसिद्ध शिल्पकृतीच्या कामास सुरूवात केली.
१७६८ : कॅप्टन जेम्स कूक एच. एम. एस. एन्डेव्हर या जहाजातुन आपल्या पहिल्या सफरीवर निघाला.
१७९१ : जॉन फिच यांना स्टीमबोट साठी अमेरिकेचे पेटंट देण्यात आले.
१८८३ : डच इंडीज (सध्याचे इंडोनेशिया) बेटावरील क्राकाटाऊ ज्वालामुखीच्या उद्रेकात १३५ गावे भस्मसात होऊन सुमारे ३६,००० लोकांचा बळी गेला.
१९२० : अमेरिकेतील महिलांना १९६५ च्या कायद्या अंतर्गत मतदान करण्याचा अधिकार मिळाला.
१९४४ : दुसरे महायुद्ध चार्ल्स द गॉलने पॅरिसमधे प्रवेश केला.
१९७२ : पश्चिम जर्मनीतील म्युनिच येथे २० व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९४ : लोन टेनिसपटू रमेश कृष्णन आणि मध्यम पल्ल्याचा धावपटू बहादूर प्रसाद यांना के. के. बिर्ला फांउंडेशनचा पुरस्कार जाहीर
१९९६ : दक्षिण कोरियात १९७९ मध्ये झालेल्या लष्करी कटाबद्दल माजी अध्यक्ष चुन दू वान यांना मृत्यूदंडाची तर त्यांचे उत्तराधिकारी प्रो ताय वू यांना साडेबावीस वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.
२००२ : दक्षिण अफ्रिकेच्या जोहान्सबर्ग शहरांत दहा दिवसांच्या पृथ्वी शिखर परिषदेस प्रारंभ झाला.
२००८ : भारतीय तेलगु चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता चिरंजीवी यांनी आपला नवीन पक्ष प्रजा राज्यम पक्षाची स्थापना करून आंध्र प्रदेश राज्यातील तिरुपती या ठिकाणी पहिली सभा घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४० : हॉट एअर बलून चे शोधक जोसेफ-मायकेल मॉन्टगॉल्फ़र यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑक्टोबर १८१०)
१७४३ : ॲन्टॉइन लॅव्हाझिये फ्रेन्च रसायनशास्त्रज्ञ, आधुनिक रसायनशास्त्राचा जनक (मृत्यू: ८ मे १७९४)
१८९१ : भारतीय हिंदी साहित्याचे लेखक व कादंबरीकार आचार्य चतुरसेन शास्त्री यांचा जन्मदिन.
१९१० : मदर तेरेसा शांततेचा नोबल पुरस्कार तसचं, भारतीय सर्वोच्च नागीर पुरस्कार भारतरत्न सन्मानित अल्बेनियन-भारतीय रोमन कॅथोलिक धर्मगुरू व समाजसेविका (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९७)
१९२२ : ग. प्र. प्रधान समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ञ, राजकारणी, लेखक, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती. 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभार', 'लोकमान्य टिळक', हाजी पीर', 'सोनार बांगला', 'भाकरी आणि स्वातंत्र्य' इ. मराठीतील पुस्तके प्रसिद्ध आहेत. (मृत्यू: २९ मे २०१०)
१९२७ : बी. व्ही. दोशी प्रख्यात वास्तुविशारद
१९२७ : भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता, ज्येष्ठ काँग्रेस नेता, व हरियाणा राज्याचे माजी मुख्यमंत्री बंसीलाल यांचा जन्मदिन.
१९२८ : हिरो साइकिलचे सहसंस्थापक ओम प्रकाश मंजाल यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट २०१५)
१९४४ : अनिल अवचट लेखक व सामाजिक कार्यकर्ते
१९५६ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व देशाच्या प्रथम पंतप्रधान महिला इंदिरा गांधी यांचे दिवंगत पुत्र संजय गांधी यांच्या पत्नी मेनका गांधी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२३ : अँथनी व्हॉन लीवेनहॉक डच सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (जन्म: २४ आक्टोबर १६३२)
१९२७ : त्यांनी पॅरिस ते न्यूयॉर्क या ५,८०० किलोमीटरच्या विनाथांबा विमानोड्डाण स्पर्धेत भाग घेऊन साडे तेहतीस तासांत ती स्पर्धा जिंकली. वैमानिकी जीवनाच्या अनुभवांवरील त्यांच्या 'द स्पिरीट ऑफ सेंट लुईस' या पुस्तकास पुलित्झर पुरस्कार मिळाला. (जन्म: ४ फेब्रुवारी १९०२)
१९३४ : प्रसिद्ध भारतीय बंगाली संगीतकार, गीतकार आणि गायक, तसचं, महान कायदेपंडित, परोपकारी, समाजसेवक, शिक्षणतज्ञ आणि साहित्यिक अतुल प्रसाद सेन यांचे निधन.
१९४८ : कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ख्यातनाम महाराष्ट्रीयन मराठी साहित्यकार, लेखक, नाट्याचार्य, पत्रकार आणि लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांचे सहकारी व केसरी वृत्तपत्राचे संपादक व नवाकाळ वृत्तपत्राचे संस्थापक (जन्म: २५ नोव्हेंबर १८७२)
१९५५ : मुंबई मराठी साहित्य संघाचे संस्थापक अ. ना. भालेराव यांचे निधन.
१९५५ : मल्याळी चित्रपट अभिनेते बालन के. नायर यांचे निधन.
१९७४ : चार्ल्स ऑगस्टस लिंडबर्ग धाडसी अमेरिकन वैमानिक.
१९७५ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी आणि काँग्रेस सेवा दलाचे संस्थापक व राजकारणी डॉ. नारायण सुब्बाराव हार्दिकर यांचे निधन.
१९९९ : नरेन्द्रनाथ डेव्हिस करंडक लॉन टेनिसपटू (जन्म:)
२०१२ : ए. के. हनगल पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वातंत्र्यसेनानी, हिंदी चित्रपट व रंगमंच अभिनेते (जन्म: १ फेब्रुवारी १९१७)

# नेवासामध्ये शेतकरी आत्महत्येच्या निषेधार्थ रास्तारोको आंदोलन

नेवासा । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील वडुले येथील शेतकरी बाबासाहेब सरोदे यांच्या आत्महत्येच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली कुकाणा येथील बसस्थानक चौकात सर्वपक्षीय रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश महासचिव व प्रवक्ते प्रा. किसन चव्हाण यांनी महाराष्ट्रातील फडणवीस सरकारवर गंभीर आरोप केले. त्यांनी बाबासाहेब सरोदे यांची आत्महत्या ही आत्महत्या नसून फडणवीस सरकारने केलेला खून असल्याचा दावा करत सरकारवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.



प्रा.किसन चव्हाण यांनी आंदोलनादरम्यान सांगितले की, ''फडणवीस सरकारचा निषेध व्यक्त करण्यासाठी आणि शेतकऱ्यांवरील अन्यायाविरोधात धिक्कार व्यक्त करण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. आम्ही सर्व शेतकऱ्यांची मुले आहोत आणि बाबासाहेब सरोदे यांच्या कुटुंबावर ओढवलेल्या प्रसंगाविरोधात रस्त्यावर उतरलो आहोत.'' त्यांनी सरकारवर शेतकरी, बहुजन, अल्पसंख्याक आणि आदिवासीविरोधी धोरणे राबवल्याचा आरोप केला. चव्हाण यांनी पुढे म्हटले की, ''निवडणुकीत देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू आणि कर्जमुक्ती देऊ असे आश्वासन दिले होते. मात्र, हे आश्वासन फसवे ठरले आहे. सरकारला जाब विचारण्यासाठी आंदोलन केल्यास अर्बन नक्षलवादाचा ठपका ठेवून तुरुंगात टाकले जाते.'' काँग्रेस नेते संभाजी माळवदे म्हणाले ''सध्याचे राजकारण खालच्या पातळीवर गेले आहे. आरोप-प्रत्यारोपांमध्ये सर्वसामान्य शेतकरी आणि गरीब माणूस पिळवटला जात आहे. रोज शेतकरी आत्महत्या होत असताना राजकीय नेत्यांमध्ये संवेदनशीलता उरलेली नाही. महायुती सरकारने दोन महिन्यांत सातबारा कोरा करण्याचे आणि कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, ते पूर्ण करावे. अन्यथा, फसवणुकीचा गुन्हा दाखल व्हायला हवा.आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे नेते अनिल जाधव, नेवासा तालुका अध्यक्ष पोपटराव सरोदे, लहुजी सेनेचे भैरवनाथ भारस्कर, शेतकरी संघटनेचे अशोक काळे, बाबासाहेब खराडे, संजय वाल्हेकर, संदीप चाबुकस्वार, विजय गायकवाड, शंकर भारस्कर, अशोक गर्जे, मच्छिंद्र कार्ले, बाबासाहेब आल्हाट, नितीन गोरडे, विनोद गोरडे, जोसेपाल्लाट, दीपक सरोदे, आकाश इंगळे, संदीप शिरसाट यांच्यासह विविध पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले. त्यांनी सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचा तीव्र निषेध व्यक्त केला.

# साईबाबा संस्थानच्या प्रसादाचा भाव वाढला

## लाडूच्या पाकिटासाठी द्यावे लागणार अधिक पैसे




शिर्डी । प्रतिनिधी

श्रीसाईबाबांच्या बुंदी लाडू प्रसादाचा भाव ५० टक्क्यांनी वाढविण्यात आला आहे. पूर्वी वीस रुपयांना मिळणारी दोन लाडूची पाकिटे आता तीस रुपयांना मिळणार आहेत.

संस्थानच्या मते, मोफत वाटल्या जाणाऱ्या बुंदी प्रसादातील तोटा भरून काढण्याच्या हेतूने ही दरवाढ केली आहे. जो प्रसाद श्रद्धेने घरी नेला जातो, भाविकांच्या देणग्यांवर चालणाऱ्या विश्वस्त संस्थेने असा व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून श्रद्धेच्या प्रतीकातूनच तोटा भरून काढावा का? असा थेट सवाल भाविक करत आहेत.

विशेष म्हणजे, गोरगरिबांना परवडणारे दहा रुपयांचे एक लाडूचे पाकीट (ज्याची वार्षिक विक्री दीड कोटींच्या घरात होती) आणि मध्यमवर्गीयांना सोयीचे पंचवीस रुपयांचे तीन लाडूचे पाकीट बंद करून संस्थानने केवळ एकच प्रीमियम पर्याय ठेवला आहे.

एकीकडे मोफत भोजनाचा आणि माफक दरातील चहा, कॉफी, दूध, नाश्त्याचा कौतुकास्पद उपक्रम व दुसरीकडे प्रसादातून हिशोब जुळविण्याची कसरत, हे गणित काही भाविकांना कळेनासे झाले आहे. बाबांच्या दर्शनानंतर प्रसादाची गोडी आता भाविकांच्या खिशाला परवडणार का? हाच खरा प्रश्न आहे.

# मराठा आरक्षणासाठी 'चलो मुंबई'

## जामखेडमधून हजारो मराठा बांधव आंदोलनात होणार सहभागी

जामखेड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, या लढ्यासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांनी 'चलो मुंबई'चा नारा देत २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाचा निर्धार जाहीर केला आहे. याच पार्श्वभूमीवर अखंड मराठा समाज, जामखेडच्या वतीने रविवारी, २४ ऑगस्ट २०२५ रोजी जामखेड शहरात दुसरी नियोजन बैठक यशस्वीपणे पार पडली. या बैठकीत जामखेड तालुक्यातील हजारो मराठा बांधवांनी मुंबईतील आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला.



यापूर्वी २१ ऑगस्ट रोजी जामखेडमध्ये पहिली बैठक झाली होती. त्यानंतर पुढील नियोजनासाठी आजच्या बैठकीत मराठा बांधवांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. तालुक्यातील गावागावात समन्वय बैठका घेऊन जास्तीत जास्त मराठा बांधवांना आंदोलनात सहभागी करून घेण्याचे ठरले. यासाठी वाहनांचे नियोजन, जेवण आणि पाण्याची व्यवस्था यावर सविस्तर चर्चा झाली. मराठा सेवक गावोगावी बैठका घेऊन वाहनांचे नियोजन करणार आहेत.

मनोज जरांगे पाटील २७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे रवाना होणार असून, दुपारी अहिल्यानगर येथे पोहोचणार आहेत.

याच दिवशी जामखेडमधील जुन्या तहसील कार्यालयासमोर हजारो मराठा बांधव मुंबईला जाण्यासाठी एकत्र येणार आहेत. सायंकाळी जामखेडमधून वाहनांनी निघालेले मराठा बांधव अहिल्यानगर येथे जरांगे पाटील यांच्या ताफ्यात सामील होणार आहेत.या बैठकीला जामखेड तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, मराठा बांधव, सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, डॉक्टर्स, शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठा आरक्षणासाठीचा हा लढा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने पाठिंबा दर्शवला.

# बनावट नोटांद्वारे फसवणूक; तिघे गजाआड; एक कोटीच्या बनावट नोटा जप्त

अहिल्यानगर। प्रतिनिधी

बनावट नोटा देवून अर्थिक व्यवहार करत फसवणूक करणाऱ्या टोळीच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या आहेत. नगर- दौंड रस्त्यावरील कायनेटिक चौकाजवळ ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडून तब्बल एक कोटी रूपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.



इंद्रजित बिबीशन पवार (वय २९), दीपक राजेंद्र भांडारकर (वय ३२, दोघे रा. शांतीनगर, भोसरी ता. हवेली, जि. पुणे) व शरद सुरेश शिंदे (वय २९, रा. वरंवडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर) अशी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत. दरम्यान, कारवाई सुरू असताना आरोपी जितेंद्र ममता साठे (रा. वासुंदे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) याच्यासह चौघे फरार झाले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्त्वाखाली ही कारवाई करण्यात आली. कबाडी यांना या टोळीबाबत गोपनीय माहिती मिळाली. ही टोळी दौंड कडून नगरकडे एका पांढऱ्या रंगाची कार व दुचाकीने येत आहेत. त्यांच्याकडे भारतीय चलनाच्या बनावट नोटा असून ते या नोटा खऱ्या असल्याचे भासवून अर्थिक व्यवहार करण्यासाठी येत आहेत. या माहितीनुसार कबाडी यांनी तत्काळ पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या. पथकाने नगर- दौंड रोडवरील कायनेटीक चौकापासून दोनशे मीटर अंतरावरील हनुमान मंदिराजवळ सापळा रचून कारमधून आलेल्या तिघा आरोपींना ताब्यात घेतले. दरम्यान, यावेळी दुचाकीवरील दोघे व कारमधील तिघे पळून गेले. सहायक निरीक्षक हरिष भोये, हेड कॉन्स्टेबल सुनिल पवार, सुरेश माळी, दीपक घाटकर, हृदय घोडके, भिमराज किसन खर्से, आकाश काळे, अमोल कोतकर, बाळु खेडकर, मनोज साखरे, उमाकांत गावडे आदींनी ही कारवाई केली.

## साडेनऊ लाखांच्या हुबेहुब नोटा

पथकाने पंचासमक्ष ताब्यातील आरोपी व कारची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून एकुण नऊ लाख ५७ हजार रुपये किंमतीचे भारतीय चलनाच्या हुबेहुब दिसणाऱ्या पाचशे रूपयांच्या नोटा, तसेच भारतीय बच्चो का बैंक ५०० रुपये असे छापलेले प्रत्येक बंडल मध्ये १०० कागदी नोटा असलेले १२ बंडल, तसेच भारतीय बच्चो का बैंक ५०० रुपये असे छापलेले बंडल त्यातील प्रत्येक बंडल मध्ये १०० कागदी नोटा, तसेच भारतीय बच्चो का बैंक २०० रुपये असे छापलेले बंडल, त्यातील प्रत्येक बंडल मध्ये १०० कागदी नोटा, एक कार, दुचाकी, चार मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# बदनापूरला अवैध दारु विक्री;६४ हजारांचा मुद्देमाल जप्त

बदनापूर। प्रतिनिधी

तालुक्यातील सोमठाणा-बदनापूर रोडवर एक व्यक्ती अवैधरित्या देशी व विदेशी दारू विक्रीसाठी घेऊन जात असल्याची माहिती मिळताच, बदनापूर पोलिसांनी सापळा रचून ६४ हजार रुपयांच्या मुद्देमालासह आरोपीस ताब्यात घेतले आहे. आरोपीचे नाव राजू बादवेल आहे.



बदनापूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये सोमठाणा-बदनापूर रोडवर इसम राजू बादवेल, राहणार दुधनवाडी फाटा, बदनापूर, हा त्याच्या एचएफ डीलक्स मोटरसायकलवर देशी-विदेशी दारूची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने घेऊन जात असल्याची माहिती गुप्त माहितीदाराकडून मिळाली. रेल्वे पटरी सोमठाणा रोड समोर सदर इसम मिळून आला. पोलिसांनी पाहणी केली असता अंदाजे १७,४०० रुपये किंमतीची देशी व विदेशी दारू मिळून आली. त्याच्यावर दारूबंदी कायद्याअंतर्गत कारवाई केली आहे.त्याच्या ताब्यातून देशी व विदेशी दारू, ४५ हजार रुपये किंमतीची एक मोटरसायकल असा एकूण ६२,४००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कारवाई पोलिस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अप्पर पोलिस अधीक्षक आयूष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे, पोलिस उपनिरीक्षक विष्णू कुंटे, सहाय्यक फौजदार बाबासाहेब जऱ्हाड, कॉन्स्टेबल शाबान तडवी यांनी केली आहे.


# बी. रघुनाथांच्या जन्मगाव सातोन्यात स्मारक उभारणी करण्याची मागणी

परतूर। प्रतिनिधी

तत्कालीन परभणी आणि आताच्या जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील सातोना या छोट्याशा खेड्यात २५ ऑगस्ट १९१३ रोजी जन्मलेले बी. रघुनाथ उर्फ भगवान रघुनाथ कुलकर्णी हे निजामी राजवटीत ललित लेखन करणाऱ्या महत्त्वाच्या लेखकांपैकी एक होते. मराठी साहित्याच्या इतिहासात त्यांच्या लेखनाचा उल्लेख क्वचितच दिसतो. मात्र, त्यांचे साहित्य वाङ्मयीन मूल्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरते. स्वातंत्र्यपूर्व काळात उपेक्षित राहिलेल्या या प्रतिभावंत लेखकाच्या पदरी स्वातंत्र्यानंतरच्या ७९ वर्षांतही उपेक्षा आलेलीच दिसते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद आपण साजरा करत असताना मराठी साहित्य समृद्ध करणाऱ्या बी. रघुनाथांसारख्या साहित्यिकाला आपण विसरत चाललो आहोत. बी. रघुनाथांचे नाव विचारत सातोन्यात येणाऱ्या साहित्यिकांना बी. रघुनाथांचा वारसा सांगणारे काहीच आढळू नये, ही शोकांतिका म्हणावी लागेल.

बी. रघुनाथांच्या स्मृती कायम जपल्या जाव्यात, त्यांच्या साहित्यांची ओळख नव्या पिढीला व्हावी यासाठी त्यांच्या सातोना या जन्मगावी स्मारक उभारण्यात यावे, अशी साहित्यप्रेमींची मागणी आहे. या मागणीचा शासन स्तरावर पाठपुरावा करण्यासाठी आज त्यांच्या जयंतीदिनी बी. रघुनाथ स्मारक संघर्ष समिती स्थापन केली जात आहे.

# विद्यार्थ्यांनी साकारल्या शाडू मातीच्या मनमोहक गणपती मूर्ती



राजूर। प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील राजूर येथे दैनिक दिव्य मराठी व जीईएस एज्युकेशनल ग्रुप शाळेच्या एक हजार विद्यार्थ्यांनी शनिवारी शाडूच्या मातीपासून गणपती मुर्ती तयार केल्या. तसेच यंदाच्या गणेशोत्सवात आपल्या घरी इकोफ्रेंडली गणपती मुर्तीची स्थापना करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.सदरील शाळेतर्फे मागील १२ वर्षांपासून पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जनजागृती केली जात असून याला कृतीची जोड देत शाडू मातीपासून मुर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. यंदाही छत्रपती संभाजीनगर येथील मोरया फाउंडेशनच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाच तास मुर्ती बनवण्याचे प्रशिक्षण दिले. यात विद्यार्थ्यांनी आकर्षक मुर्ती साकारत देखीव रंगरगोंटी केली. यावेळी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषद शाळेचे केंद्रप्रमुख रमेश पुंगळे, शाळेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, उद्धव घायाळ, प्राचार्या आशाताई पुंगळे व शिक्षकांची उपस्थिती होती.

गणेश चतुर्थीच्या दिवशी भाविकांना मोफत शाळेत तयार झालेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती गणेश चतुर्थीच्या दिवशी राजुरेश्वराच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना मोफत दिल्या जातात, यंदाही असेच नियोजन आहे. आकर्षक अशा या मुर्ती बनवण्यासाठी विद्यार्थ्यांना मोरया फाउंडेशनचे प्रकाश कुलकर्णी, उमेश ठोबळे, शिवम सिंग, भास्कर सिंग आदींनी परिश्रम घेतले आहे. विद्यार्थी करतील पर्यावरणाचे रक्षण : मुख्याध्यापक पुंगळे शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना पर्यावरण वाचवण्याची शिकवण दिली जात आहे. दै. दिव्य मराठीच्या प्रोत्साहनामुळे दरवर्षी शाडूच्या मातीपासून गणपती मुर्ती तयार करत जनजागृती केली जात आहे. तसेच गणपती तयार करण्याच्या कार्यशाळेतून प्रशिक्षित झालेले विद्यार्थी इतरांनाही गणपती तयार करण्याचे शिकवण देत आहे. त्यामुळे आजचे विद्यार्थी भविष्यात पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत, अशी प्रतिक्रीया संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे यांनी दिली.

# अहिल्यानगर शहरात धार्मिक स्थळाची तोडफोड

## समाजकंटक गजाआड, पोलिसांकडून शांततेचे आवाहन

अहिल्यानगर। प्रतिनिधी

गांधी मैदान ते पटवर्धन चौक रस्त्यावरील एका धार्मिक स्थळाच्या तोडफोड प्रकरणातील दोघा समाजकंटकांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. उर्वरीत सहा संशयित आरोपींचा शोध सुरू आहे. आरोपींनी रविवारी पहाटेच्या सुमारास धार्मिक स्थळाची तोडफोड केली होती. दरम्यान, घटनेच्या निषेधार्थ मुस्लिम समाजबांधवांनी पोलिस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढून निषेध नोंदविला.



योगेश सखाराम झोंड (रा. भूतकरवाडी, अहिल्यानगर, मूळ रा. वाळकी, ता. जि. अहिल्यानगर) व बबलू रामभाऊ पाल (रा. भूतकरवाडी, मूळ रा. उत्तर प्रदेश) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. जेसीबी मालक अरुण गोविंद खरात (रा. समता चौक, सावेडी) यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणातील संशयित आरोपी सचिन दारकुंडे, समतानगर, सावेडी), दत्ता गायकवाड (पूर्ण नाव माहिती नाही) व इतर तीन ते चारजण फरार असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. याप्रकरणी ॲड. वसीम राउफ खान (रा. देशपांडे हॉस्पिटलजवळ, पटवर्धन चौक, आनंदीबाजार) यांनी फिर्याद दिली आहे. पहाटे तीनच्या सुमारास एक पिवळ्या रंगाचा जेसीबी व निळ्या रंगाच्या मोपेडवरून आलेल्या अनोखळी व्यक्तींनी हिंदू-मुस्लिम समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या धार्मिक स्थळाची जाणीवपूर्वक तोडफोड करून नुकसान केले. हिंदू- मुस्लिम धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने हे कृत्य करण्यात आले. समस्त हिंदु-मुस्लिम धर्मियांच्या धार्मिक भावना दुखावण्याचाही प्रयत्न केला. दंगल घडवून आणण्याच्या उद्देशाने हे कृत्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान, घटनेची माहिती समजताच पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपाधीक्षक शिरीष वमने, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी, पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. सकाळी आनंदी बाजार परिसरात काही वेळासाठी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी परिस्थिती हाताळत कोणताही अनुचित प्रकार घडू दिला नाही. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी तत्काळ तपासाचे आदेश दिले. त्यानंतर काही तासातच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोघा आरोपींना ताब्यात घेतले असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

# केएसके महाविद्यालयात आ.विक्रम काळे यांच्या उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप

## चर्चासत्राच्या निमित्ताने आदिवासी समाजाच्या समस्याबाबत सखोल विचारमंथन

**बीड । प्रतिनिधी**

**आजही भारतातील बहुतांश आदिवासी समाज पाड्यांवर, वाड्यांवर व वस्त्यांवर जीवन जगत आहे. तो विकासाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर आहे. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने आदिवासी समाजाच्या समस्यांबाबत देश–विदेशातील संशोधक व अभ्यासक एकत्र आले. यानिमित्ताने त्यांच्या प्रश्नांवर सखोल विचारमंथन झाले. यातून आदिवासींच्या उत्कर्षाचे नवे मार्ग समोर येतील. यापुढे आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे नियोजन कसे करावे, याचे धडे इतर महाविद्यालयांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडून घ्यावेत, इतके नेटके नियोजन त्यांनी केले, असे गौरवोद्गार छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी काढले.**

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त 'जनजाती गौरव' विशेष कार्यक्रमांतर्गत 'भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका' या विषयावर आधारित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात पार पडले. सोमवारी (दि.२५) बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात चर्चासत्राची यशस्वी सांगता झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार विक्रम काळे बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर होत्या. प्रमुख पाहुण्यांमध्ये दक्षिण आफ्रिका विद्यापीठाचे मानववंशशास्त्र व पुरातत्वशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.झोडवा रादेबे, कला व संगीत विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.बोंगानी मखोंझा, नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील, सामाजिक कार्यकर्ते डॉ.अशोक बेलखोडे, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, आमेर सिद्दिकी, डॉ.शिवानंद क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना आ.विक्रम काळे म्हणाले, डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासारख्या नवतरुणाच्या हाती नवगण शिक्षण संस्थेची धुरा सोपविल्यानंतर संस्थेत आमूलाग्र बदल दिसू लागले

◀◀ पान ३ वर

### चर्चासत्रातून आदिवासी समाजघटकांना दिशा मिळणार : डॉ.दीपाताई क्षीरसागर

अध्यक्षीय भाषणात डॉ.दीपाताई क्षीरसागर म्हणाल्या, फारसा परिचित नसलेला आदिवासी समाजाचा विषय बीडमध्ये आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातून चर्चेत आला. आदिवासी समाजघटकांना पुढील दिशा मिळेल व त्यांच्या प्रश्नांवर उपाययोजना आखल्या जातील. त्या पुढे म्हणाल्या की, स्व.केशरकाकू क्षीरसागर यांनी स्थापन केलेल्या नवगण शिक्षण संस्थेचा कारभार आता नूतन सचिव डॉ.योगेश क्षीरसागर पाहत आहेत. सचिवपदी निवडीनंतर पहिल्यांदाच त्यांनी संस्थेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले. हा निर्णय कौतुकास्पद असून प्रारंभ ते समारोपापर्यंत उत्साह कायम राहिला.



आष्टी : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची आष्टी तालुक्यातील जामगाव येथे जयंती साजरी करण्यात आली यावेळी अण्णाभाऊंच्या पुतळ्याला पुष्पा हार अर्पण करताना ज्येष्ठ नेते लालासाहेब शिंदे, भगवानराव भोसले नवनाथ चखाले माजी जि सदस्य पत्रकार शरद रेडेकर विजुभाऊ साठे कैलास रणसिंग माजी सरपंच अनिल रणसिंग संतोष रणसिंग सुनील रणसिंग जालिंदर गायकवाड पत्रकार आण्णासाहेब साबळे आदी मातंग समाजाचे बांधव उपस्थित होते.

## एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा पगार गणेशोत्सवापूर्वी होणार –प्रताप सरनाईक

**जालना । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या इतर कर्मचाऱ्याप्रमाणे एसटीच्या सुमारे ८३ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांचे ऑगस्ट महिन्याचा वेतन गणपती उत्सवापूर्वी देणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटीच्या कर्मचाऱ्यांचा पगार हा महिन्याच्या ७ तारखेपासून १० तारखेच्या दरम्यान होत असतो. परंतु यंदा गणपती उत्सव हा ऑगस्ट महिन्याच्या शेवटी आल्याने केवळ वेतनामुळे त्यांचे उत्सवाच्या आनंदावर विरजण पडू नये! म्हणून राज्य सरकारला एसटीच्या विविध सवलती पोटी ची प्रतिपुर्ती रक्कम लवकर देण्याची विनंती केली. त्यानुसार २५ ऑगस्ट रोजी या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, लवकरच एसटीच्या सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या बॅक खात्यांवर त्यांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन जमा होईल.



**बीड : येथील मांजरसुंबा येथे सवांद बैठकीदरम्यान संघर्षयोद्धा मा.मनोज (दादा) जरांगे पाटील हे आले असता त्यांचा भव्य सत्कार करताना अखिल भारतीय छावा संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा रोमन यांच्यासह आदी.**

## राज्यपाल हरिभाऊ बागडेंच्या हस्ते धारूर तालुक्याचे भूमिपुत्र भागवत दराडे सन्मानित

दिंद्रुड । प्रतिनिधी

ग्रामीण भागात ग्रामविकास क्षेत्रात आदर्श व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या धारूर तालुक्यातील भागवत दराडे व सौ.छायाताई भागवत दराडे या दांपत्यांस राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे एका शानदार समारंभात भूमिपुत्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.याबद्दल दराडे दांपत्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




छत्रपती संभाजीनगर येथे दै.लोकमतच्या वतीने सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, ग्रामविकास आदि विविध क्षेत्रात उल्लेखनीय व विशेष कार्य करणाऱ्यांचा भूमिपुत्र पुरस्कार देऊन गौरव करत सन्मान करण्यात आला.यात धारूर तालुक्यातील देवठाणा–जैतापुर ग्रुप ग्राम पंचायतच्या सरपंच सौ.छायाताई भागवत दराडे व त्यांचे पती तथा सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले युवानेतृत्व भागवत दराडे या दांपत्यास ग्रामविकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल भूमिपुत्र पुरस्कार जाहीर करण्यात आला होता.या पुरस्काराचे वितरण नुकतेच छत्रपती संभाजीनगर येथे एका शानदार समारंभात राज्यपाल मा.हरिभाऊ बागडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.याप्रसंगी एडिटर इन चीफ तथा माजीमंत्री राजेंद्र दर्डा, नंदकुमार पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.भागवत दराडे यांनी धारूर तालुक्यात सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर राहुन,

◀◀ पान ३ वर

## गहूखेल–म्हसोबावाडी पंचक्रोत बिबट्याचा वावर

**आष्टी। प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा, भोजेवाडी, गहुखेल, म्हसोबावाडी सह पंचक्रोशीत गेल्या दोन महिन्यांपासून बिबट्याचा वावर होत असल्याने शेतकरी भयभीत झाले आहेत काल रात्री म्हसोबावाडी गावातील शेतकरी मोहन बाबु शेकडे हे आपल्या मालकी हक्काच्या माळरानावर आपले कुरे चालायच्या साठी गेले असता सुमारे संध्याकाळ पाच वाचण्याच्या सुमारा त्यांची एक शेळी गायब असल्याचे लक्षात आले वनविभागाचे कर्मचारी बन्सी तादंळे व संपूर्ण कुटुंब शोध शोध करत असताना ती आज मयत अवस्थेत सापडली तात्काळ त्यांनी वनविभागाचे कर्मचारी बन्सी तादंळे व पत्रकार प्रेम पवळ सह पशुवैद्यकीय कर्मचारी खेडकर यांना संपर्क साधला असता घटना स्थळी पंचनामा होऊन बिबट्यानेच त्या शेळीचा खतमा केल्याचे निष्पन्न झाले म्हसोबावाडी व पंचक्रोशीसह म्हसोबावाडीचे सरपंच शिवा शेंडे यांनी वनविभागाला लवकरच निवेदन देऊन लवकर त्या बिबट्याचा बंदोबस्त करु असा शेतकऱ्यांना दिलास दिला यावेळी शेतकरी मोहन शेकडे, वनविभागाचे कर्मचारी बन्सी तादंळे, कृष्णा बडे, बाबासाहेब बडे, अशोक बडे, अविनाश खोरदे, पत्रकार प्रेम पवळ उपस्थित होते.



### दोन महिन्यांत चार शेळ्यांचा बळी

## अन्यायकारक अधिभार व वाढीव विजदेयक अकारून घरगुती विजग्राहकांची लुट –गिराम



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील विज ग्राहकांवर अन्यायकारक अधिभार व वाढीव विज रक्कम लादून हे भाजप शासित सरकार सामान्य घरगुती विज ग्राहकांची लुट करत असल्याचे निदर्शनास आल्या नंतर आज या विषयी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी महाराष्ट्र राज्य विधुत वितरण कंपनी च्या अभियंत्यास निवेदन दिले.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित () यांचेकडून आकारण्यात येणाऱ्या वीज देयकांमध्ये सामान्य घरगुती ग्राहकांवर असह्य आर्थिक भार टाकण्यात येत असल्याची बाब सर्वत्र निदर्शनास येत आहे. मासिक ९६ युनिट इतका अल्प वापर असूनही देयकाची रक्कम सुमारे रुपये ८५४ इतकी होत आहे. त्यामध्ये निव्वळ उर्जा शुल्क अंदाजे रुपये ४०० असून उर्वरित रक्कम विविध अधिभार व स्थिर शुल्काच्या स्वरूपात आकारली जाते. उर्जा शुल्क, वहन शुल्क,

◀◀ पान ३ वर

## मराठी साहित्य परिषदेच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी प्रेम पवळ

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा गावातील प्रेम पवळ अर्थातच प्रितम सोन्याबापु पवळ हे एका सेवानिवृत्त आरोग्य सेवक कर्मचारी अत्यंत गरीब कुटुंबातील व्यक्ती आहेत ते दै.राज्य लोकतंत्र मराठी वृत्तपत्रचे सुद्धा प्रतिनिधी म्हणून काम पहातात काल झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या कोर कमेटीत प्रेम पवळ यांना आष्टी तालुकाध्यक्षपदी प्रेम पवळ यांची निवड करण्यात आली आहे. सामाजिक व साहित्यक्षेत्रातील त्यांच्या भरीव योगदानाची दखल घेऊन परिषदेचे संस्थापक अध्यक्ष शरद गोरे यांनी ही नियुक्ती केली आहे.



त्यांचे आजपर्यंत सहा काव्यसंग्रह प्रकाशित असुन त्यांना आठरा राज्यस्तरीय पुरस्काराने देखील ते सन्मानीत आहेत याचीच दखल घेत दिलेल्या नियुक्तीपत्रानुसार, या पदाचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंतचा असेल. आता परिषदेचे कार्य समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल. सुदृढ समाजनिर्मितीसाठी

◀◀ पान ३ वर

## माजी मंत्र्याचे माजी पीए धसे विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल

**चकलांबा । प्रतिनिधी**

**माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे काही काळ खाजगी स्वीय सहाय्यक राहिलेले व सध्या खासदार बजरंग सोनवणे यांचे दिल्ली येथील कामकाज पाहत असलेले धनंजय धसे आणि त्यांचा मुलगा देवाशीष धसे यांच्याविरोधात तब्बल साडेतेरा लाख रुपयांच्या फसवणुकीचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.**

तक्रारदार भरत नवनाथ खेडकर यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, २०१६ मध्ये धनंजय धसे आणि त्यांचा मुलगा देवाशीष यांनी खेडकर यांच्याशी संपर्क साधून "तुम्हाला शेत तलावाच्या दुरुस्तीचे टेंडर मिळवून देतो आणि आपण पार्टनरशिपमध्ये हे काम करू," अशी ऑफर दिली.

त्यावर विश्वास ठेवून खेडकर यांनी त्यांच्याकडे एकूण १३.५ लाख रुपयांची रक्कम दिली. मात्र, आजतागायत ना टेंडर मिळाले, ना पैसे परत करण्यात आले. वारंवार पाठपुरावा करूनही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर खेडकर यांनी चकलांबा पोलीस ठाण्यात धसे पितापुत्रांविरोधात फसवणुकीची तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यासंदर्भात खासदार बजरंग सोनवणे यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्यात आला असता "धनंजय धसे हे आमच्याकडे ऑन रेकॉर्ड कुठल्याही अधिकृत पदावर नाहीत. ते आमचे स्वीय सहाय्यक नाहीत," असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. तरीही धसे हे दिल्ली आणि मुंबईतील कामकाजासाठी उपस्थित असतात, असे कार्यकर्ते सांगत असल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

## खा.बजरंग सोनवणेंच्या हस्ते आज मांजराचे जलपूजन

### शेतकऱ्यांची राहणार उपस्थिती, दोन दरवाज्यातून पाण्याचा विसर्ग

केज । प्रतिनिधी

केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे.आज सकाळी दहा वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते धरणातील पाण्याचे जलपुजन करण्यात येणार आहे.



लातूर शहर, लातूर औद्योगिक वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी.चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅक्वॉटर पाण्याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष लाभ होतो. तसेच धरणातील पाण्यावर बिगर सिंचन योजना सुध्दा २१ आहेत तर पिण्याच्या पाणी योजना १६ कार्यरत आहेत. नागरिकांना पिण्यासाठी सरासरी ६१.९३ दलघमी एवढे पाणी आरक्षित ठेवण्यात येते. पाण्याच्या सिंचनाच्या व औद्योगिक दृष्ट्या मांजरा धरण अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मागील काही दिवसांपुर्वी धरण पुर्णपणे भरले होते. यानंतर सहा दरवाजे उघडून पाणी सोडण्यात आले होते. आता चार दरवाजे बंद करण्यात आले असून दोन दरवाज्यातून ४९.४८ क्यूसेक्सने मांजरा नदी पात्र पाण्याचा विसर्ग सुरू आहे. मांजरा धरणामुळे केज तालुक्यातील मोठ्या प्रमाणात हरीतक्रांती झालेली असून आज खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन होत आहे.

## पळून गेलेले जोडपे पकडले

**चकलांबा । प्रतिनिधी**

**येथील पोलीस ()ठाणे हद्दीतील उमापूरमधून एक अल्पवयीन मुलगी १९ वर्षाच्या तरुणासोबत मध्यरात्री १ वाजता घर सोडून पळून गेली होती.याबाबत पहाटे ५ वाजता मुलीच्या वडिलांनी चकलांबा पोलीस ठाण्यात येत तक्रार दाखल केली.त्यानुसार पहाटे ५.३० वाजता पोलिसांनी या जोडप्याचा शोध घेण्यास सुरुवात केल्यानंतर साडेतीन तासाच्या शोधमोहिमेनंतर हे जोडपे पोलिसांना सापडले.सपोनि संदीप पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी भल्या पहाटेपासून शेतात आणि वस्तीत झाडाझडती घेतल्यामुळे त्या मुलीचा आणि मुलाचा शोध लागला होता.पोलिसांच्या या कारवाईबाबत पालकांनी आभार मानले आहेत.**

उमापूरमधील एका १७ वर्षीय मुलीने गावातील १९ वर्षीय मुलासोबत मध्यरात्री १ वाजता घरातून पळ काढला.दोघांनी ही घर सोडल्यानंतर काही वेळातच मुलगी आणि तो मुलगा घरात नसल्याने दोन्ही कुटुंबाना लक्षात आले.त्यानंतर पीडित मुलीच्या वडिलांनी पहाटे ५ वाजता चकलांबा पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली.घटनेचे गांभीर्य ओळखून सपोनि संदीप पाटील यांनी मुलीचे मोबाईलचे लोकेशन काढले.यानंतर लोकेशनवरून सदर जोडपे

◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे - आयुक्त शेखर सिंह

## गणेशोत्सव तयारीसंदर्भातील महापालिकेत झालेल्या आढावा बैठकीत विसर्जन घाट नियोजन, वाहतूक, स्वच्छता व सुरक्षेसह विविध उपाययोजनांबाबत देण्यात आले निर्देश

पिंपरी । प्रतिनिधी

यंदा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत हा उत्सव साजरा होत असून, या अनुषंगाने शहरातील मुख्य मिरवणूक मार्ग, विसर्जन घाट तसेच इतर ठिकाणी वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षा यांसह आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून उत्सव मूर्तींचे विसर्जन करण्यात येणाऱ्या घाटांवर योग्य नियोजन करावे, असेही आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

आगामी गणेशोत्सव व गणेशमूर्ती विसर्जन अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिका, पोलीस प्रशासन, महावितरण आदी विभागांची आढावा बैठक आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात झालेल्या या बैठकीला सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रवीण मोरे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, सह शहर अभियंता बापू गायकवाड, देवन्ना गट्टुवार, उपायुक्त अण्णा बोदडे, संदीप खोत, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, अश्विनी गायकवाड, अजिंक्य येळे, अमित पंडित, तानाजी नरळे, किशोर ननवरे, पूजा दुधनाळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्यासह पोलीस निरीक्षक अमित डोळस, महावितरणचे



कार्यकारी अधिकारी अतुल देवकर, सोमनाथ मुंडे यांच्यासह महापालिका, पोलीस प्रशासन आणि महावितरणचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, 'गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी येथील मुख्य विसर्जन मार्गासह विसर्जन घाट मार्गावरील खड्डे बुजवण्यास प्राधान्य द्या. या मार्गांवरील धोकादायक सर्व्हिस वायर, केबल शिफ्ट करण्यासह विद्युत विषयक आवश्यक कामे करण्यात यावीत. विसर्जन घाटावर आवश्यक तेवढे कृत्रिम विसर्जन हौद तयार करा. पीओपी उत्सवमूर्ती व शाडू मातीच्या मूर्तींच्या विसर्जनाची वेगळी व्यवस्था करा. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सर्व घाटांवर गणेशमूर्ती संकलनाचे व्यवस्थापन करा. विसर्जन केलेल्या उत्सव मूर्ती घेऊन जाण्यासाठी वाहनांचे योग्य नियोजन करा, तेथे आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध करून द्या. सर्व घाटांवर आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी जीवरक्षकांसह जलद प्रतिसाद पथके तैनात करावीत, अग्निशमन जवान आणि आपदा मित्र यांची नियुक्ती करावी, असे निर्देश आयुक्त सिंह यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आठ प्रभागांतील गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या तयारीचा आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी आढावा घेतला. त्यानंतर आयुक्त सिंह म्हणाले, 'गणेशमूर्ती विसर्जनाच्या सर्व ठिकाणी सक्षम वैद्यकीय पथकासह सुसज्ज रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात यावी, मिरवणूक मार्गावर तसेच विसर्जन घाटांवर पुरेशी विद्युत व्यवस्था करावी, गणेशोत्सव कालावधीत संपूर्ण शहरात स्वच्छतेची विशेष मोहीम राबवावी, स्थानिक पातळीवर सेवाभावी संस्था व गणेश मंडळे यांच्याशी समन्वय ठेवावा, विसर्जन तसेच मिरवणूक मार्गावरील धोकादायक व अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करावी, विसर्जनाच्या ठिकाणी मिरवणूक संपेपर्यंत स्वच्छ पिण्याच्या पाण्याच्या टँकरची व्यवस्था करावी, मिरवणूक मार्गावर आणि शहरातील गर्दीच्या ठिकाणी मोकाट जनावरे फिरणार नाहीत यासाठी पथकांची नियुक्ती करून कार्यवाही करावी,' असे निर्देशही आयुक्त सिंह यांनी दिले.यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीची माहिती सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर यांनी दिली. महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने महापालिकेने केलेल्या तयारीचे सादरीकरण केले.

**मंडप परवानगी अर्ज तातडीने निकाली काढा**


पिंपरी चिंचवड शहरातील गणेश मंडळांना विविध परवाने उपलब्ध करून देण्यासाठी सर्व ८ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये एकखिडकी कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, 'सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी गणेश मंडळांना मंडप परवाने देताना मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे तसेच शासनाच्या आदेशांचे पालन करावे. अनधिकृत मंडप उभारले जाणार नाहीत याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच मंडप परवानगीसाठी आलेले अर्ज तातडीने निकाली काढावेत. पुढील दोन दिवसांत अशा अर्जांची संख्या वाढू शकते. अशा परिस्थितीत पोलीस प्रशासनासोबत समन्वय साधून परवाना देण्याबाबत कार्यवाही करावी,' असेही आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

# प्रेरणादायी अध्यात्मिक वक्त्या जया किशोरी यांच्या हस्ते होणार श्रीमंत भाऊसाहेब रंगारी बाप्पाची प्राणप्रतिष्ठा

**पुणे । प्रतिनिधी**

हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'च्या बाप्पाची प्राणप्रतिष्ठा प्रेरणादायी अध्यात्मिक वक्त्या जया किशोरी यांच्या हस्ते बुधवारी (दि. २७) दुपारी १२ वाजून १५ मिनिटांच्या मुहूर्तावर होणार आहे. त्यापूर्वी ढोल ताशांच्या गजरात जंगी मिरवणूक देखील निघणार आहे.





मंडळाचे उत्सव प्रमुख आणि विश्वस्त पुनीत बालन यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, "गणेश चतुर्थीला सकाळी बाप्पाची आरती होईल. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता प्रत्यक्ष मिरवणुकीला सुरवात होईल. सुरवातीला लाठीकाठी हा मर्दानी खेळ आणि केशव शंखनाद होईल. त्यानंतर ७ पथकांकडून श्रीमंत भाऊसाहेब रंगारी भवनासमोर ढोल-ताशांची सलामी दिली जाणार आहे. श्रीराम पथक, कलावंत, वाद्यवृंद, विश्वगर्जना, स्वयंभूगर्जना, गजर, नूमवि ही सात ढोल ताशा पथके बाप्पाच्या मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. या सर्व पथकांच्या वादन मिरवणुकीने श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्टच्या बाप्पाचे वाजत गाजत आगमन होणार आहे. गतवर्षीप्रमाणे यावर्षीही बाप्पाच्या रथाला बैलजोडी न लावता मंडळाचे कार्यकर्ते हा रथ ओढणार आहेत. दुपारी १२ वाजून १५ मिनिटांच्या मुहर्तावर प्रेरणादायी अध्यात्मिक वक्त्या जया किशोरी यांच्या हस्ते बाप्पाची प्राणप्रतिष्ठा होणार आहे." प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर पुढील कार्यक्रम होणार असल्याचे पुनीत बालन यांनी सांगितले.

# माथेफिरूने बराखीत टाकला युरिया; २०० पिशव्या कांदा सडला

सासवड । प्रतिनिधी

पुरंदर तालुक्यातील पोपट नारायण अगिवले (रा. बांदलवाडी गराडे, ता. पुरंदर) यांच्या शेतातील कांद्याच्या बराखीत माथेफिरूने युरिया टाकल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे सुमारे २०० गोण्या कांदा सडल्याने अंदाजे २ लाख रुपयांचे नुकसान झाले असून, अगिवले यांनी नाइलाजाने हा सडलेला कांदा टाकून दिला.


याबाबत समजलेली माहिती अशी की, गराडे बांदलवाडीचे शेतकरी पोपट अगिवले यांनी आपल्या शेतामध्ये कांदा साठवण्यासाठी नवीन बराख तयार करून हवा खेळत राहावी यासाठी बराखीला लोखंडी जाळी लावली होती. बराखीत साठवलेल्या कांद्याला मोकळी हवा मिळत असल्याने चार महिन्यांपूर्वी साठवलेला कांदा चांगल्या स्थितीमध्ये होता.

अगिवले यांनी त्यांच्या शेतातील बराखीत ४ महिन्यांपूर्वी कांदा साठवला होता. शनिवारी (दि. २३) सकाळी ते बराखीकडे फेरफटका मारायला गेले असता त्यांना बराखीतून पाणी वाहत असल्याचे दिसले. त्यांनी आत पाहणी केली असता कांद्यात युरिया टाकल्याचे आढळून आले. त्यामुळे बहुतांश कांदा सडून गेला होता.एकूण २०० पिशव्यांपैकी केवळ २० पिशव्यांतील कांदा वापरण्यायोग्य असल्याचे दिसून आले, तर उर्वरित संपूर्ण कांदा फेकून द्यावा लागला. या प्रकारामुळे शेतकरी वर्गामध्ये चिंता आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित घटनेची तपासणी व दोषींवर कारवाईची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# सिंहगड किल्ल्यावर फिरायला गेलेली पाच मुलं बेपत्ता; शहरात खळबळ

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील सिंहगड किल्ल्यावर गौतम गायकवाड या २४ वर्षीय तरुणाच्या बेपत्ता होण्याच्या घटनेनंतर आता आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आज सकाळी सिंहगड फिरायला गेलेली पाच मुलं अडकल्याची माहिती समोर येत आहे. या मुलांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत आपण अडकल्याची माहिती दिली आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी या मुलांचा शोध सुरु केला आहे. पोलिसांना या मुलांचे लोकेशन मिळाले असून, त्या दिशेने मुलांचा शोध घेतला जात आहे.



या मुलांनी व्हिडिओमध्ये आपण कुठे अडकलो आहोत याची देखील माहिती दिली आहे. पोलीस या मुलांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, मुलांशी संपर्क तुटला आहे. पोलिसांचे एक पथक सिंहगड परिसरात दाखल झाले असून, मुलांचा शोध सुरु केला आहे. एकाच आठवड्यातील ही दुसरी घटना असल्याने पुण्यात पुन्हा एकदा खळबळ उडाली असून, सिंहगडावरील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते आहेत. मात्र, आत्ताच्या ताज्या घटनेनंतर पुणे शहर हादरलं आहे. या पाच मुलांचा शोध तीव्र केला असून, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली जात आहेत. ही मुलं नेमकी कशी हरवली? त्यांच्या सोबत काय घडलं? याबाबत सोशल मीडियावर चिंता व्यक्त केली जात आहेत.

# गोरक्षणाच्या नावाखाली राज्यात मोठी लॉबी सुरू; सरकारने कारवाई न केल्यास आम्ही पोलीस स्टेशनसमोर छावण्या उभारू - सदाभाऊ खोत

पुणे । प्रतिनिधी

गोरक्षणाच्या नावाखाली राज्यात मोठी लॉबी सुरू आहे. यांचे कॉर्पोरेट ऑफिस आहेत. शेतकऱ्यांना याचा त्रास होतोय. सरकारने याबाबत लक्ष घालून कारवाई करावी. यावर कारवाई केली नाही तर पोलीस स्टेशन समोर आम्ही जनावराच्या छावण्या उभं करू. असा थेट इशारा रयत क्रांती संघटनेचे प्रमुख सदाभाऊ खोत (डवरलहर्री घर्हें) यांनी दिला आहे. गाई म्हशीमध्ये राहून आमची माय-बहिण, बाप शेण, दूध काढतो आणि हे गोरक्षक म्हणणारे मोठ्या मोठ्या कॉर्पोरेट ऑफिसमधून धंदा करत आहेत.



सरकारला माझी विनंती आहे, की बाबा शेतकऱ्यांचा व्यवसाय आशाने मरून जाईल. गाड्या अडवल्या जातात त्यांना मारलं जातं त्यामुळे यावर कारवाई करा. याबाबत मी मुख्यमंत्र्यांशीही बोलणार असल्याचे सदाभाऊ खोत म्हणाले. दोन महिन्यांपूर्वी सांगलीच्या शेतकऱ्यांना मारहाण करून त्यांचा दहा म्हशी जबरदस्तीने फुरसुंगीच्या गोशाळेत नेऊन ठेवल्याचं सांगितलं होतं. शेतकऱ्यांना न्यायालयात जाऊन मग या म्हशी परत मिळवण्यासाठी आदेश मिळाले होते. तो आदेश घेऊन शेतकरी गोशाळेत म्हशी घेण्यासाठी गेल्यावर म्हशी गोशाळेत नसल्याचे लक्षात आलं. विचारपूस केल्यावर या गोरक्षकांनी उडवाउडवीची उत्तरं देऊन म्हशींना चरायला डोंगरावर सोडल्यावर त्या निघून गेल्याचे उडवाउडवीची उत्तरं दिलीत. या प्रकरणात शेतकऱ्यांची ना दाद, ना फिर्याद, अशी परिस्थिती झालीय. त्यामुळे या गोरक्षकांवर कारवाई करावी, अशी मागणी सदाभाऊ खोत यांनी केली.

**गोरक्षकांवर कारवाई करावी, मुख्यमंत्र्यांशी आम्ही चर्चा करू- सदाभाऊ खोत**

थार सारख्या कॉर्पोरेट गाड्यामधून काही लोक पुण्या-मुंबईवरून येतात आणि आमच्या गोरक्षणाचे काम करत असल्याचे सांगतात. गोरे गुंठे असतात तुम्हाला कळत नाही, शहरात कुत्रे-मांजर बघितले यांच्याकडे गाई गोटे कुठून आले. मुख्यमंत्र्यांशी आम्ही चर्चा करू. मात्र जे शेतकरी नेते माझ्यावर टीका करत आहेत त्यांना या बैठकीमध्ये बोलून यावर त्वरित उपाय करावा. आम्ही आता गोशाळेत जाणार आहोत. काल पोलिसांच्या समोर पंचनामा केला. तिथे एकही जनावर नव्हतं. तेच पोलीस पुन्हा म्हणतात सात जनावर होते, आज परत पोलिसांना सांगितले आमचे २१ जनावर आहेत. त्यामुळे कोणीतरी त्यांना पाठीशी घातले हे दिसतंय. असेही सदाभाऊ खोत म्हणाले.

# अथर्व सुदामेच्या हिंदू मुस्लीम ऐक्याच्या रिलवरुन वाद; व्हिडिओ डिलीट करत मागितली माफी

पुणे । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये तुफान लोकप्रिय असलेला रिलस्टार अथर्व सुदामे हा जोरदार चर्चेमध्ये आला आहे. मराठमोळा एन्फ्लुएन्सर असलेला अथर्व सुदामे हा त्याच्या रिल्समुळे नेहमी चर्चेत असतो. समाजातील विविध विषयांवर आणि मराठी संस्कृतीवर अथर्व सुदामे व्हिडिओ बनवत असतो. यापूर्वी देखील त्याने अनेकदा संवेदनशील विषय हाताळले आहेत. मात्र यावेळी गणेशोत्सवापूर्वी अथर्व सुदामे याने बनवलेल्या व्हिडिओला रोष सहन करावा लागला आहे.




आपल्या रिल्समधून हसवणाऱ्या अथर्व सुदामेने यावेळी गणेशोत्सावाच्या निमित्ताने व्हिडिओ शेअर केली होती. यामध्ये त्याने हिंदू मुस्लीम ऐक्याचा विषय हाताळत व्हिडिओ तयार केली होता. मात्र त्यावर काही लोकांनी विरोधी भूमिका घेतल्यामुळे त्याने हा व्हिडीओ डिलिट केला आहे. लोकांच्या भावना दुखावल्या गेल्यामुळे अथर्वने व्हिडिओ जारी करत माफीही मागितली आहे. अथर्व सुदामे याने या प्रकरणी माफी मागितली असली तरी काही लोकांनी त्याला पाठिंबादेखील दिला आहे.

अथर्व सुदामे याच्या व्हिडिओवरुन समाजातील काही लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्याने शेअर केलेल्या या व्हिडिओमध्ये हिंदू मुस्लीम ऐक्याचा संदेश देण्यात आला होता. यामध्ये होते की, सुदामे स्वत: एका दुकानात गणेशमुर्ती खरेदी करण्यासाठी गेलेला दिसतोय. तिथे त्याने गणेशमुर्तीची किंमत ठरवून ती घेऊन जाणार असतो तेवढ्यात मूर्तीकाराचा मुस्लीम मुलगा त्याला जेवणाचा डबा द्यायला येतो. यावरुन मुर्तीकार मुस्लीम असल्याचे अथर्व सुदामेला दिसते. त्यानंतर मूर्तीकार आपला धर्म समजल्यामुळे तुम्हाला माझ्याकडून मूर्ती खरेदी करायची नसेल तर समोरही एक दुकान आहे, तिथून तुम्ही मूर्ती घेऊ शकता, असे सांगतो.

यावर अथर्व सुदामे म्हणतो गणपती घडवताना तुमच्या मनात चांगलेच भाव होते ना? माझे बाबा म्हणतात की आपण साखर व्हावं साखर शेवयांची खीरही गोड करते आणि शिरखुरमाही गोड बनवते. आपण वीट व्हावं जी मंदीर तसेच मशीद उभारण्यासाठी कामी येते. आपण फुल व्हावी जे हारातही वापरले जाते आणि चादर अर्पण करण्यासाठी वापरले जाते, असे म्हणताना दिसतोय. या व्हिडीओच्या माध्यमातून गणेशोत्सवामध्ये हिंदू-मुस्लीम ऐक्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. मात्र काही लोकांना त्याची ही व्हिडिओ आवडली नसल्यामुळे वाद निर्माण झाला.

# कौशल्य विकासाने तरुणाईत आत्मविश्वास आणि रोजगाराच्या नव्या संधी - निळकंठ पोमण

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी कौशल्यम लाइटहाऊसमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

पिंपरी । प्रतिनिधी

'कौशल्य हे फक्त नोकरी मिळविण्याचे साधन नाही, तर आत्मनिर्भरतेचा ठोस पाया आहे. प्रशिक्षणाद्वारे तरुणाईत आत्मविश्वास वाढतो, रोजगाराच्या नवनव्या संधी निर्माण होतात आणि उद्योजकतेची दालने खुली होतात,' असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महापालिकेचे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण यांनी केले.



पिंपरी चिंचवड महापालिका आणि लाइटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या कौशल्यम लाइटहाऊस प्रकल्पांतर्गत कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी महापालिकेचे नगर सचिव मुकेश कोळप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सीएसआर मुख्य सल्लागार विजय वावरे, लाइटहाऊसचे समन्वयक लखन रोकडे आदी उपस्थित होते.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लाइटहाऊसच्या वतीने 'कौशल्यम' या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील तरुणाईसाठी विविध क्षेत्रांतील प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. संवादकला, तंत्रज्ञान, उद्योजकता, सेवा उद्योग अशा विविध क्षेत्रातील अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे. आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला असून, त्यापैकी अनेकांनी रोजगाराच्या संधी मिळविल्या किंवा स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या यशोगाथा उपस्थितांसमोर मांडल्या. काहींनी प्रशिक्षणानंतर पहिली नोकरी मिळाल्याचा आनंद व्यक्त केला, तर काहींनी मिळालेल्या कौशल्यांचा उपयोग करून लघुउद्योजकतेच्या वाटचालीला सुरुवात केली. या अनुभवकथनांमुळे इतर विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि प्रेरणा निर्माण झाली.

पिंपरी चिंचवड शहरातील तरुणाईला संधी दिल्यास ते समाजातील सकारात्मक बदलाचे मोठे वाहक ठरू शकतात. समाज विकास विभाग व लाइटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन 'कौशल्यम' हा प्रकल्प शहरातील युवकांना एक दिशा देण्याचे काम करीत आहे.

– निळकंठ पोमण, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिका समाज विकास विभाग आणि लाइटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नामुळे 'कौशल्यम' उपक्रमातून शहरातील तरुणाई अधिक सक्षम, आत्मनिर्भर आणि उज्ज्वल भविष्यासाठी सज्ज होत आहे. हा उपक्रम शहरातील प्रत्येक तरुणापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार आहे.

– ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# वारकरी संप्रदायाची माफी मागा, अन्यथा आंदोलन; ह.भ.प. खरात महाराज यांची सुप्रिया सुळे यांच्यावर टीका

**आळंदी । प्रतिनिधी**

**खासदार सुळे यांनी मांसाहार प्रकरणाच्या वक्तव्यावर माफी मागावी, अन्यथा वारकरी संप्रदाय त्यांच्याविरोधात मोठे आंदोलन उभे करेल, असा इशारा खरात यांनी दिला.**



खा. सुळे यांच्या वक्तव्यामुळे वारकरी संप्रदायामध्ये आक्रोश आहे. असं वक्तव्य शहाण्या माणसाचं लक्षण नाही. खा. सुळेंनी राजकारणाच्या ठिकाणी राजकारण करावं, यामध्ये कुठेही वारकरी संप्रदायाचा अपमान करू नये. पृथ्वीतलावर एकच विठ्ठल आहे, दोन विठ्ठल नाहीत. त्यामुळे खा. सुप्रिया सुळे यांनी केलेले हे वक्तव्य निषेधार्थ आहे. याचा आम्ही वारकरी पाईक संघाकडून निषेध व्यक्त करतो.

वारकरी संप्रदायातील लोकांनी मद्य आणि मांस यापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला आहे. याचा कुठेतरी खा. सुप्रिया सुळे यांच्याकडून हरताळ फासण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप महाराजांनी केला. भगवान विठ्ठल हा सर्वांचाच माता-पिता आहे. भगवान विठ्ठलाने सर्व जीव-जंतू तयार केले आहेत. त्यांची हत्या करून भक्षण करणे, हे त्या मात्या-पित्याला म्हणजेच विठ्ठलाला नक्कीच आवडणार नाही. त्यामुळे त्यांचे हे वक्तव्य निषेधार्ह आहे.

वारकऱ्यांच्या पांडुरंगाला बळी दिलेला चालत नाही. त्यामुळे खा. सुप्रिया सुळे यांचा पांडुरंग कोणता आहे, असा प्रश्न महाराजांनी उपस्थित करत या वक्तव्याचा निषेध केला. 'मौस खाता हौस करी जोडूनी वैरी ठेवीला' या संत वचनानुसार वारकरी संप्रदाय चालतो. या वक्तव्याचा विपर्यास करून खा. सुप्रिया सुळे यांनी केलेले विधान निषेधार्ह आहे, असेही ह.भ.प. खरात महाराज म्हणाले.